

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५०३

REFBK-0024155
REFBK-0024155

# गुलशन-ए-ग़जल

प्रा. जाधव टी. के.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०३
क्र. क्र. २४१५५
काव्य ८।३।८५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ वगव्य
2503
28955
नाउ८४

REFBK-0024155
REFBK-0024155

मराठी अर्थासहित उर्दू ग़ज़ल-संग्रह

# गुलशन-ए-ग़ज़ल

प्रा. टी. के. जाधव, 'अश्क'

किरण प्रकाशन, पुणे ३०

'GULSHAN–E–GAZAL'
(A Collection of Urdu Gazals with Marathi meaning)
by Prof. T. K. JADHAV, 'ASHQ'

प्रथम आवृत्ती : डिसेंबर १९८३

प्रकाशक : किरण प्रकाशन, ८६३ (नवा) सदाशिव, ज्ञानप्रबोधिनी पथ, पुणे ३०.

मुद्रक : अ. के. कोटावळे, ॐ मुद्रणालय, २५० अ, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

सजावट : नागेश सुरवसे

मूल्य : वीस रुपये

वितरण-व्यवस्था : मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे, मुंबई.

© प्रा. टी. के. जाधव

प्रिय 'चारू'!....
( चारुदत्त शंकरराव साळवी )

'गुलशन-ए-ग़ज़ल'
तुझ्या रसिकतेला सादर समर्पण.
मित्रा !....
तुझ्यासमवेत रंगलेल्या ग़ज़लच्या
त्या अनेक मैफली विसरणे मला
शक्य आहे का !....

—'टी. के.'

## ॥ ऋण-निर्देश ॥

श्री. ए. एम्. कारीगर, ' सर ',
प्रा. सुरेशचन्द्र नाडकर्णी,
डॉ. भगवानदास तिवारी, डी. लिट्.,
श्री. भगवानदास खंडेलवाल,
श्री. विजय कांगणे आणि
श्री. प्रकाश हिरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०३
दा. क्र. २४१५५
काव्य ८।३।८४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# म नो ग त

प्रिय रसिकहो !

'गुलशन-ए-ग़ज़ल' हा देवनागरी लिपीतील उर्दू काव्यसंग्रह आपणां सर्वांसमोर ठेवताना मला अत्यंत आनंद होत आहे. या काव्यसंग्रहात माझ्या कॉलेज-जीवनापासूनच्या निवडक ग़ज़ला मी संकलित केल्या आहेत.

ग़ज़ल लिखाणाची आवड मला तशी 'हायस्कूल लाईफ'पासूनच होती. उर्दू ग़ज़लांतील तरल सौंदर्यानुभूती, आत्यंतिक नाजुकता, काटेकोर बांधणी, बंदिस्त नियम, सुंदर-मधुर कल्पनाविलास, कलंदर वृत्ती, जीवन-मृत्यूचे आगळे-वेगळे तत्त्वज्ञान, प्रेमाची उदात्तता, कविमनाची उच्च उड्डाणे, ज्वलंतपणा आणि कोमलता, शब्दांची आशयघनता, यमक-अंत्ययमकाचे (क़ाफ़िया-रदीफ) ठेवलेले भान, व्यष्टि-समष्टि-संघर्षाचे समर्थ चित्रण, जग आणि जीवनाला व्यापून टाकणारी व्यापक प्रतीक-योजना, महान कवींची व्यासंगपूर्ण परंपरा, लालित्यपूर्ण भाषासमृद्धी, रचनेतील संगीताचे अटळ स्थान, कर्मकांडाचा निषेध व सहज नैसर्गिक मानवी प्रवृत्तींना वाव, मनोरम गेयता असलेली छंद-योजना (बहेर)...प्रामुख्याने उर्दू ग़ज़लच्या या सर्व गुण-वैशिष्ट्यांमुळेच मी उर्दू ग़ज़लकडे पूर्णपणे आकर्षित झालो, जिवापाड प्रेम करू लागलो, भेटेल ते वाचू लागलो...जीवनातला एक काळ असा गेला, की उर्दू ग़ज़लशिवाय दुसरे काही मी वाचतच नव्हतो. वाचता वाचताच उर्दू ग़ज़लच्या एवढ्या प्रेमात पडलो, की मलाही नकळत मी ग़ज़ल लिहूही लागलो.

चार अभ्यासू मित्रांच्या नजरेस माझे प्रयत्न पडल्यानंतर 'रसिकते'वर 'कवित्वा'चा शिक्का आपोआपच पडला.

आज कितीतरी वर्षांनंतर त्याच ग़ज़ला संकलित करून 'गुलशन-ए-ग़ज़ल' या काव्यसंग्रहाद्वारे 'रसिका'चा 'ग़ज़लकार' बनून, वाचकहो, मी तुम्हां सर्वांसमोर नम्रपणे येत आहे.

तसे पाहता, उर्दू ग़ज़लचे क्षेत्र अत्यंत विस्तृत आहे. मिर्झा 'ग़ालिब', 'मीर', 'मोमिन', 'जफ़र', 'साहिर' लुधियानवी, 'जौक़', 'जिगर'

मुरादाबादी, ' शकील ' बदायुनी, ' फ़ैज़ ' अहमद फ़ैज, ' फिराक़ ' गोरख-पुरी, ' इक़्बाल ', ' क़तिल ' शिफ़ाई, ' मजाज ', ' कैफ़ी ' आज़मी, ' मजरुह ' सुलतानपुरी, ' अमीर ' मीनाई, दाग़ ', ' जाँ निसार अख्तर ', ' मीनाकुमारी ' अशा कितीतरी पुरातन व आधुनिक शायरांनी ग़ज़लच्या क्षेत्रात आप-आपल्या सामर्थ्यानुसार लेखन केले आहे. तेथे माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीनेही आपली लेखणी आजमावून पाहण्याचा प्रत्यन केला आहे.

एक मात्र खरे, की या पुस्तकाच्या रूपाने जे काही केले आहे, ते मनाच्या आनंदासाठीच केले आहे, ' स्वान्तःसुखाय ' केले आहे. कारण :

**और कहीं बहल जाये, ऐसी मेरी फ़ितरत कहाँ ।**
**बहल जाता कहीं और, तो होती शिकायत कहाँ ॥**

**छोड भी देता मैं शेरो–सुख़न को, ऐ ' अश्क ',**
**पर क्या करें, बजूज इसके मुझे है राहत कहाँ ॥**

[ ' आणखी कुठं रमण्यासारखा माझा स्वभाव नव्हताच... तरी समजा, तसं मन रमलंच, तर मला तक्रार करण्याचं काही कारणच नव्हतं... हे ' अश्क ' ! मी काव्याचा नाद सोडूनही दिला असता ... पण काय करावं ? ...याशिवाय जीवनात मला सुख आहे तरी कुठं ? ' ]

रसिकहो ! म्हणूनच काव्यनिर्मितीचे सातत्य जीवनात राहिले. ग़ज़ल-विषयीचे प्रेम कधी ओसरले नाही व त्यातूनच ' गुलशन–ए–ग़ज़ल 'चा जन्म झाला.

' गुलशन–ए–ग़ज़ल' म्हणजे ग़ज़लांची बाग ! या काव्यरूपी बागेत आनंदरूपी सुगंध आपल्याला अवश्य मिळेल, अशी आशा आहे... या ग़ज़ल–संग्रहाचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे–यात संकलित केलेल्या माझ्या उर्दू ग़ज़लांचा सरळ–सुलभ मुक्त भावानुवादही प्रत्येक ग़ज़लच्या बाजूच्या पृष्ठावर दिला आहे. तो याचसाठी, की मराठी वाचकांना, रसिकांना या ग़ज़लांचे अंतरंग कळावे व त्यांनाही उर्दू ग़ज़लांचा आनंद मनापासून लुटता यावा.

माझ्या मते ' गुलशन–ए–ग़ज़ल ' एक छोटीसी नाममात्र खिडकी आहे–जीतून मराठी रसिकांना विशाल अशा उर्दू काव्याच्या समृद्ध वनश्रीचे दर्शन,

अल्पांशाने का होईना, पण अवश्य घडणार आहे !

पण त्याआधी, त्या वनश्रीत संचार करण्यासाठी, तेथील प्रवासात काव्यानंद लुटणे सुलभ होण्यासाठी, उर्दू ग़ज़लची रचना व मूलभूत नियम समजावून घेणे आवश्यक ठरते. म्हणून या ठिकाणी उर्दू ग़ज़लच्या रचनानियमांविषयी थोडी-फार चर्चा करणे योग्य होईल.

'ग़ज़ल म्हणजे प्रेम-गीतं गाणं, सुंदर स्त्रियांची मनोरम वर्णनं करणं ! ग़ज़ल म्हणजे एक अशी काव्यरचना, की जीत मीलन ( वस्ल ), विरह ( फ़िराक़ ), प्रेम ( इश्क ), आसक्ती, ओढ ( इश्तयाक़ ), कामना, आशा, ( हसरत ), निराशा ( यास ) यांचं वर्णन असेल.'

( संदर्भग्रंथ : 'शेरो-शायरी' : गोयलीय । भारतीय ज्ञानपीठ, काशी. द्वितीय संस्करण । जुलई १९५० )

ग़ज़ल सर्वसाधारणपणे, कमीत कमी दहा ओळींची असते. दहा ओळी म्हणजे पाच 'शेर' त्यात असतात. 'शेर' म्हणजे 'द्विपदी' ( काव्याच्या दोन ओळी ). 'शेर'मधील एका ओळीला 'मिसरा' असे म्हणतात. दोन 'मिसरे' मिळून एक 'शेर' तयार होतो. अशा पाच 'शेरां'ची मिळून एक 'ग़ज़ल' तयार होते.

ग़ज़ल च्या पहिल्या दोन ओळींस 'मतला' असे म्हणतात. यात दोन्ही ओळींचे यमक जुळविले जाते.

'ग़ज़ल'ची रचना अधिक बारकाव्याने समजावून घेण्यासाठी उदाहरणादाखल, शायर बहादूरशहा, 'ज़फ़र' यांची एक प्रसिद्ध ग़ज़ल घेऊ :

**'लगता नहीं है दिल मेरा उजडे दयार में ।**
**किसकी बनी है आलमे-नापायदार में ॥'**

वरील दोन ओळी 'ज़फ़र' यांच्या ग़ज़लच्या प्रारंभीच्या ओळी आहेत. त्यांना 'मतला' असे म्हणतात. या 'मतल्या'त 'दयार' व नापायदार' यांना 'यमक' म्हणतात. उर्दूत यालाच 'क़ाफ़िया' म्हणतात. 'दयार' व 'नापायदार' या शब्दांनंतर आलेल्या 'में' या शब्दाला 'रदीफ़' संबोधतात. हा रदीफ़ किंवा अंत्ययमक ग़ज़लच्या प्रत्येक 'शेर'मध्ये येते. 'मतल्या'नंतर जे 'शेर' येतात, त्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळींत ( दुसऱ्या 'मिसऱ्यात'च फक्त 'क़ाफ़िया रदीफ़' येतो. ) उदाहरणार्थ,

' कह दो इन हसरतों से कहीं और जा बसें ।
इतनी जगह कहाँ है दिले-दाग़दार में ॥ '

शेराच्या या नियमाप्रमाणेच ' ग़ज़ल ' मधील इतर दोन ' शेर ' येतात. उदाहरणार्थ,

' उम्रे-दराज़ माँगके लाये थे चार दिन ।
दो आरजू में कट गये, दो इन्तज़ार में ॥ '

त्याचप्रमाणे--

' यक शाख़े-गुलपे बैठ के बुलबुल है शादमाँ ।
काँटे बिछा दिये हैं दिले-लालाजार में ॥ '

अशा प्रकारे ' मतल्या 'नंतर येणाऱ्या ' शेरां ' मध्ये दुसऱ्या ओळीतच क़ाफ़िया–रदीफ़ येतो. ' मतल्या 'प्रमाणे दोन्ही ओळींचे यमक जुळविले जात नाही.

' ग़ज़ल 'चा पाचवा–म्हणजे शेवटचा जो ' शेर ' असतो, त्यास ' मक़ता ' असे म्हणतात. सर्वसाधारणपणे ' मक़त्या 'त ग़ज़लकार शायर स्वतःविषयी बोलत असतो. या शेवटच्या ' शेर 'मध्ये प्रत्येक ' शायर ' आपल्या उप-नावाचा–टोपणनावाचा उल्लेख करीत असतो. उर्दूत त्याला ' तख़ल्लुस ' म्हणतात. उदाहरणार्थ :

' है कितना बदनसीब, ' ज़फ़र ', दफ्न के लिये ।
दो गज़ जमीं भी न मिली कू-ए-यार में ॥ '

' ग़ज़ल ' मध्ये ' मतला ' व ' शेर ' एकापेक्षा अधिक लिहिता येतात. परंतु ' मक़ता ' मात्र एकच लिहिला जातो व तो ' ग़ज़ल ' च्या शेवटीच येतो. ' ग़ज़ल ' मध्ये जे पाच ' शेर ' येतात, ते पाचही ' शेर ' विचाराच्या दृष्टीने, आपआपल्या परीने परिपूर्ण असतात. अर्थाच्या दृष्टीने एका ' शेर 'चा दुसऱ्या ' शेर 'शी काहीही संबंध नसतो. प्रत्येक ' शेर ' तसा स्वतंत्र असतो. गीताप्रमाणे ( नज़्म ), कवितेप्रमाणे त्यात एकाच विचाराची, एकाच भावनेची एकसंधता नसते. एका ' शेर 'चा दुसऱ्या ' शेर 'शी असलेला संबंध फक्त ' क़ाफ़िया–रदीफ़ 'च्या साम्यापुरताच असतो.

गीत आणि ' ग़ज़ल ' यांतील हा एक मूलभूत फरक म्हणावा लागेल.

' ग़ज़ल ' आणि ' नज़्म ' यांत नेमका काय फरक असतो, याची आता आपण माहिती करून घेऊ या.

नज्ममध्ये ( गीतामध्ये ) विचारांची एकसंधता आवश्यक असते. एकाच विचाराचे प्रतिपादन त्यात असते; पण ग़ज़लमध्ये प्रत्येक शेर विचाराच्या दृष्टीने स्वतंत्र असतो.

ग़ज़लमधील विविध शेर ( द्विपदी ) मधून विविध विचार सांगितलेले असतात. एका ग़ज़लमध्ये अनेक कवितांची बीजे असू शकतात. म्हणूनच गजल ही कवितेची कविता आहे.

ग़ज़ल आणि नज़्म यांतील फरक समजावून देण्यासाठी फ्लॉवरपॉट व वेल यांचं उदाहरण देणं योग्य ठरेल. माझ्या मते ग़ज़ल ही फ्लॉवरपॉट-सारखी आहे – ज्यात विविध विचारांचे शेर एकत्र गुंफलेले असतात; जसे फ्लॉवरपॉटमध्ये विविध जातींची फुलं आपण एकत्र ठेवू शकतो व त्यांतून सौंदर्याची एक विशिष्ट रचना आपण करतो. तर नज़्म (गीत किंवा कविता ) यामध्ये एकच एक विचार असतो— ज्याप्रमाणे विशिष्ट जातीच्या वेलीवर, झुडुपावर विशिष्ट जातीचीच फुलं उमलतात. उदाहरणार्थ, गुलाबाच्या झुडुपावर जाई–जुईची फुलं कधी उमलणार नाहीत. पण फ्लॉवरपॉट-मध्ये आपण गुलाब, जाई–जुई, मोगरा, रजनीगंधा–सर्वच प्रकारची फुलं एकत्र रचू शकतो.

हाच मूलभूत फरक ग़ज़ल आणि नज़्म यांत आहे. तरीही सखोल दृष्टीने ग़ज़लचा विचार करता या नियमालाही अपवाद सापडू शकतो. उर्दू शायरीच्या प्रांगणात काही ग़ज़ला अशाही आहेत, की ज्यांत विचारांची एकसंधता ( नज़्मप्रमाणे, पण ग़ज़लचा इतर आकृतिबंध सांभाळून ) दिसून येते. उदाहरणार्थ,

**' वो जो हम में तुम में करार था, तुम्हें याद हो के न याद हो।**
**वही वादा निबाह का तुम्हें याद हो के न याद हो।। '**

**—मोमिन**

काही ग़ज़लांमध्ये जरी गीताप्रमाणे विचारांची एकसंधता दिसून येत असली, तरी ९५ टक्के ग़ज़लांमध्ये विचारांची विविधताच दिसून येते. म्हणजेच प्रत्येक ' शेर ' हा विचाराच्या दृष्टीने स्वतंत्र व स्वतःपुरताच परि-

पूर्ण असा असतो. प्रत्येक ' शेर 'मध्ये शायर अनुभूतीच्या एका वेगळ्या पैलूवर बोलत असतो. आपला दृष्टिकोन स्पष्ट करीत असतो.

विचाराची एकसंधता असलेल्या ग़ज़ला अशाच आहेत–जशी फ्लॉवर-पॉटमध्ये विविध फुले ठेवण्याऐवजी एकाच जातीची फुलेही ठेवता येतात.

विचाराची एकसंधता असलेल्या ग़ज़ला फारच कमी प्रमाणात सापडतात.

ग़ज़लच्या मूलभूत नियमांनुसार ग़ज़लच्या शेरांमध्ये विविधता अपेक्षित असते; पण तशी ती नसली, तरी चालते....असल्यास उत्तमच !

सर्वसाधारणपणे अशा प्रकारे ' ग़ज़ल 'चे नियम आहेत. ' ग़ज़ल' ही दहा ओळींचीच लिहिली जावी, असा काही काटेकोर नियम नाही. ' गालिब ', ' मोमिन ', ' ज़फ़र ' यांसारख्या पूर्वीच्या काही ग़ज़लकारांनी सोळा–सोळा, वीस-वीस ओळींच्या ग़ज़ला लिहिलेल्या पाहावयास मिळतात. तरीही ' ग़ज़ल 'ही कमीतकमी दहा ओळींची असावी, असा एक अलिखित नियम रूढ आहे...म्हणजे एका ' ग़ज़ल 'मध्ये एक ' मतला ', एक ' मक़्ता ' व तीन ' शेर ' असावेत.

' ग़ज़ल 'चे आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे ' ग़ज़ल' ही विशिष्ट छंदातच लिहिली जाते. त्यास उर्दूत ' बहेर ' असे म्हणतात व इंग्रजी भाषेत त्याला ' मीटर ' म्हणून ओळखतात.

उर्दू भाषेमध्ये ' ग़ज़ल 'चे एकूण छत्तीस प्रमुख ' बहेर ' मानले जातात. या छंदांमुळेच ' ग़ज़लला ' गेयता प्राप्त होते, लयबद्धता प्राप्त होते. ' ग़ज़ल ' मुख्यतः गाण्यासाठीच लिहिलेला काव्यप्रकार होय !

उर्दू शेरो-शायरीचा मूळ निर्माता ' अमीर खुसरो ' हा मानला जातो. (जन्म : सन १२५३, मृत्यू : सन १३२५ ई.) प्रारंभिक काळात ' ग़ज़ल ' ही फक्त पारलौकिक प्रेमावरच (इश्के–हक़ीक़ी) लिहिली जायची. परंतु सतत नवनवीन कवींच्या प्रवेशामुळे, कालानुसार ग़ज़लचे स्वरूप बदलून त्यात लौकिक प्रेमही (इश्के–मज़ाज़ी) डोकावू लागले....पुढे-पुढे जीवनाच्या सर्वांगीण अनुभूतींनी ग़ज़लचे सौंदर्य विविधतेने नटू लागले आणि आज ग़ज़ल परिपूर्ण होऊन पौर्णिमेच्या पूर्ण चन्द्रबिंबाप्रमाणे मोठ्या डौलाने रसिकांसमोर उभी आहे.

उर्दू ' ग़ज़ल 'विषयीचे इतके स्थूल ज्ञान घेऊन व उर्दू ' ग़ज़लां 'मध्ये वारंवार येणाऱ्या उर्दू, अरबी, फारसी भाषांतील शब्दांचा अर्थसंग्रह वाढ-

वीत, समृद्ध करीत मराठी रसिक, उर्दू ' ग़ज़ल 'च्या विशाल वनश्रीत प्रविष्ट झाल्यास त्यास ' उर्दू ग़ज़ल 'चा आस्वाद घेणे बरेचसे सुलभ होईल, असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही.

' गुलशन–ए–ग़ज़ल 'च्या वाचनानंतर मराठी रसिकांची उर्दू ' ग़ज़ल '-विषयीची तृष्णा अधिकाधिक वाढत जाऊन, उर्दू साहित्यातील ग़ज़लकारांचे साहित्य वाचण्याची इच्छा त्यांना निर्माण झाल्यास व तसे प्रयत्न होऊन, त्यांना ' उर्दू ग़ज़ल 'चा अधिकाधिक आनंद मिळविता आल्यास माझ्या ' गुलशन–ए–ग़ज़ल ' या काव्य–संग्रहाचे सार्थक झाले, असे मी मनापासून समजेन.

आज ' ग़ज़ल 'ची जादू हळू-हळू सर्व जगभर पसरत चालली आहे. आपल्या श्रेष्ठ गुणवैशिष्ट्यांमुळे ' ग़ज़ल ' सर्वांचेच प्रेम संपादन करीत आहे.

उर्दू शायरांनी शायरीत वर्णन केलेल्या अलौकिक, सुंदर, नाजूक प्रेयसीचे अद्वितीय सौंदर्य घेऊनच ' ग़ज़ल ' आज प्रत्येक रसिकाच्या हृदयमहालात, मधुर संगीताचा नाजूक पदन्यास करीत हळुवारपणे प्रवेश करीत आहे.... ' मेहंदी हसन ', ' गुलाम अली ', ' जगजित सिंग ', ' चित्रा सिंग ', ' तलत अज़ीज़ ', ' अन्वर कुरेशी ', ' अनूप जलोटा ', ' पंकज उदास ', ' बेगम अख्तर ', ' शोभा गुर्टू ', ' सलमा आगा ', ' शंकर दासगुप्ता ' इत्यादी गायक-गायिकांच्या ' लाँग-प्ले-रेकॉर्डस् ', ' कॅसेट्स् ' घरोघरी ' ग़ज़ल 'च्या मधुर सुरांनी–शब्दांनी वातावरण धुंद-फुंद करीत आहेत. ' ग़ज़ल 'ला अधिकाधिक लोकप्रियता मिळवून देत आहेत.

आज मराठी साहित्य क्षेत्रातही कवींची एक नवी पिढी ' ग़ज़ल 'कडे आकर्षित होऊन मराठीत ग़ज़ल-निर्मितीचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते...आज मराठीतही ' ग़ज़ल ' हा काव्य–प्रकार बराच लोकप्रिय झाला आहे. मराठी भाषेत ' ग़ज़ल 'ला हे नेत्रदीपक यश मिळवून देण्यात कवी सुरेश भट व इलाही जमादार यांचा फार मोठा वाटा आहे.

मराठी भाषेत प्रथम ' ग़ज़ल ' आणली, ती डॉ. माधवराव पटवर्धन ' ज्यूलियन ' यांनी. ' गज्जलांजली ' हा मराठी गझल–संग्रह त्यांनी फार पूर्वी–म्हणजे जून १९२३ मध्ये प्रकाशित केला होता.

श्री. भाऊसाहेब पाटणकरांनीही मराठी रसिकांत उर्दू काव्याची आवड निर्माण करण्यात आपला वाटा उचलला आहे.

अशा प्रकारे, ग़ज़लच्या ऊर्जितावस्थेस पूरक असलेल्या आजच्या ' ग़ज़ल '-प्रेमी वातावरणात ' गुलशन–ए–ग़ज़ल 'चे रसिकांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत होईल, अशी नम्र आशा आहे.

—प्रा. टी. के. जाधव, ' अश्क '

# गुलशन-ए-ग़ज़ल

मित्रहो, आजकाल आम्ही कसे जीवन जगत आहोत, काय सांगावं!... काळजी आणि दुःखाचं प्रमाण फारच वाढलं आहे...हे हृदय जणू दुःखाचं निवासस्थानच बनलं आहे...

आजकाल, इच्छापूर्तीसाठी केलेल्या नवसांमध्ये इच्छित फळ देण्याची शक्ती उरलीच नाही... पाहा, उपकारकर्ता ' मसीहा 'च अत्याचार करणारा निर्दयी झाला आहे....

काय करावं?... आजकाल मृत्यूही आमच्यावर रुसला आहे... जीवनावश्यक हवा व पाणी जणू विषवत बनले आहेत.

खरं पाहता, हे जग फार सुंदर आहे, रमणीय आहे...पण काय करावं?...अशा जगात, आम्ही दुर्दैवी मात्र सकाळ-संध्याकाळ बेचैन असतो, दुःख-व्याकूळ असतो... आजकाल आमच्या जीवनाची स्थिती आहे, ती अशी!

हे ' अश्क ', जीवनाच्या या प्रवासात रस्ताही कळत नाही, ध्येयही दिसत नाही आणि मार्गदर्शन करणारा कुणी मार्गदर्शकही भेटत नाही. खरोखरच, आजकाल जीवनाचा हा प्रवास किती विचित्र झाला आहे!



हैं रंजो–अलम बेश्तर इन दिनों।
हुआ दिल मेरा ग़म का घर इन दिनों ॥

नहीं है दुआमें असर इन दिनों ॥
मसीहा है बेदादग़र इन दिनों ॥

है रूठी हुई मौत, क्या कीजिए ?
है आबो-हवा गो ज़हर इन दिनों ॥

बहोत खूबसूरत है दुनिया मगर ।
हूँ बेचैन शामो-सहर इन दिनों ॥

न रास्ता, न मंज़िल, न रहबर है, 'अश्क',
न जाने है कैसा सफ़र इन दिनों ॥

हे प्रिये, आमचं हृदय तुझी आठवण विसरूच शकलं नाही, तर तूच सांग, आम्ही काय करावं ?...अशा असहायतेला सीमा तरी उरेल का ?... हे प्रिये, चोहीकडे, कणाकणांत जर तूच तू दिसू लागलीस, तर मग तूच सांग, आम्ही काय करावं ?

हे प्रिये, जागेपणी आठवण बनून व निद्रिस्त असताना स्वप्न होऊन तू आल्यास आम्ही काय करावं ?...तू आम्हांला अशा प्रकारे सतवायचंच ठरवलंस, तर मग तूच सांग, आम्ही काय करावं ?...

हे प्रिये, तुला विसरण्याचा आटोकाट प्रयत्न तर मी करेनच, पण तरीही माझे हे सारे प्रयत्न निष्फळ ठरल्यास, तूच सांग, आम्ही काय करावं ?...

हे प्रिये, तू आमचा त्याग केलास, काही हरकत नाही.... आमची काही एक तक्रार नाही... पण आता मृत्यूनंही आम्हांला आपलंसं केलं नाही, तर तूच सांग, आम्ही काय करावं ?

हे 'अश्क', प्रीतीच्या शस्त्रांनी हृदयावर झालेल्या जखमा भरून जातील ...पण या जखमा भरण्याच्या आतच, बऱ्या होण्याआधीच परत एखादेवेळी अचानकपणे त्या प्रियेच्या आठवणींनी हृदयास घेरल्यास, तूच सांग, आम्ही काय करावं ?...आमच्या अशा असहायतेला मग सीमा तरी उरेल का ?....



दिल याद तेरी भूल न पाये, तो क्या करें ।
हर सिम्त तू ही तू नज़र आये, तो क्या करें ॥

जागें तो याद, सोयें तो आये तुम्हारे ख़्वाब ।
इस दरजा कोई हमको सताये, तो क्या करें ॥

कोशिश करूँगा तुमको भूलने की मैं मगर ।
भूलेसे भी वो जो याद आये, तो क्या करें ॥

तुमसे ग़िला नहीं है के दामन छुडा लिया ।
अब मौत भी न पास बुलाये, तो क्या करें ॥

ऐ 'अश्क', दिलके ज़ख़्म तो भर जायेंगे मगर
घिर आये उनकी याद के साये, तो क्या करें ॥

मित्रांनो, खरं पाहता मानवाचं अस्तित्व एखाद्या स्वप्नाप्रमाणंच क्षणिक आहे...अरे ऽ रे !...ही कथा पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणंच नश्वर आहे, क्षणभंगुर आहे.

मित्रांनो ! त्या प्रियेची प्रीती मृगजळाप्रमाणेच मायावी आहे...कारण ती दृष्टीला दिसते, जाणवते... पण हाती मात्र लागत नाही. मग ती मायावीच नाही तर काय ?...

मित्रहो, तुम्हां कुणाला प्रलय पाहावयाचा असेल, तर त्या सुन्दरीलाच पाहा ना !... प्रलय प्रलय म्हणतात, तो म्हणजे–साक्षात तिचं तारुण्य होय !...

मित्रहो, निर्जीव मंदिरं आणि मसजिदी खुशाल तोडा... पण सजीव हृदयं जोडा... कर्मकांड, रूढी, बुरसटलेले विचार या शतकानुशतकाच्या पार्श्वभूमी-वर मी सांगितलेले नावीन्यपूर्ण मानवतावादी पुरोगामी विचार म्हणजे एक प्रकारची क्रांतीच होय !

हे ‘ अश्क ’, तूच सांग ! माझ्यात आणि त्या प्रियेत दीर्घ अंतर का नसावं, दुरावा का नसावा ?... कारण मी धरती, तर ती प्रिया मेघासमान आहे... मग विरह का होऊ नये, तूच सांग !



हस्ती आदम की ख़्वाब की-सी है।
ये कहानी हुबाब की सी है ॥

गो नज़र आये, हाथ आ न सके।
उनकी चाहत सुराब की सी है ॥

एक नज़र देखिए क़यामत को।
ये तो उनके शबाब की सी है ॥

हरमो-दैर तोड़, दिल जोड़े।
बात कुछ इन्क़लाब की सी है ॥

क्यों न हो, 'अश्क', फ़ासला हममें।
मैं ज़मीं, वो सुहाब की सी है ॥

हे जीवना ! मी हे काय करीत चाललो आहे !... मरण्याच्या इच्छेतच मी जगत चाललो आहे.... हा विरोधाभास तरी किती विचित्र आहे !

हे प्रेमा ! हा उन्माद मला कुठं घेऊन चालला आहे !... मी कोणत्या अवस्थेला पोहोचलो आहे, पाहा !... या उन्मादाच्या भरात मी प्रत्येक कणा-कणाला ' प्रिया, प्रिया ' हेच नाव देत चाललो आहे...

हे मित्रांनो ! माझी बुद्धी तर बेचैन आहे, अस्वस्थ आहे. बुद्धीला आत्मविश्वास नाही; पण माझं हृदय मात्र आत्मविश्वासानं म्हणत आहे, की या तांड्याला ( कारवाँ ) मी ' मंज़िल 'च्या ( इच्छित स्थळाच्या ) दिशेनंच पुढं-पुढं नेत आहे... म्हणजे जीवनात बुद्धीपेक्षा मनाची शक्ती, सामर्थ्य मोठं असतं... बुद्धीलाही कळत नाहीत, त्या गोष्टी मनाला उमगतात.

मित्रांनो ! पाहा, हा काय दैवदुर्विलास आहे ! ....त्या सुन्दरीच्या मादक नजरेच्या प्याल्यांनी सुखाची मदिरा पिण्याची इच्छा तर अपूर्णच राहिली... आणि याच अपूर्ण इच्छेला उराशी बाळगून किती तरी दिवस झाले, मी दररोज स्वतःचे अश्रूच पीत आहे...

हे ' अश्क ', या जीवनरूपी वस्त्राचा वृत्तान्त काय विचारतोस !... तो न विचारणंच बरं !... पाहा, या जीवनरूपी वस्त्राच्या चिंध्याचिंध्या झाल्या आहेत...आणि मी जागोजागी फाटलेल्या या वस्त्राला सांधण्याचा, शिवण्याचा एक करुण प्रयत्न करीत आहे...जीवनानं विस्कळीत असणं आणि माणसानं त्याला सुरळीत करण्याचा प्रयत्न करणं-त्यात अयशस्वी होणं-यातच माणसाचा पराजय व दैवाचा विजय निहित आहे... आणि हीच मानवाच्या जीवनाची करुण कहाणी आहे.



ऐ ज़िन्दगानी, क्या ये किये जा रहा हूँ मैं।
मरने की आरज़ू में जिये जा रहा हूँ मैं॥

ऐ इश्क, ले चला है कहाँ मुझको ये जुनूँ
उनका ही नाम सबको दिये जा रहा हूँ मैं॥

बेचैन है ख़िरद प' ये कहता दिल मेरा।
मंज़िल पे कारवाँ को लिये जा रहा हूँ मैं॥

उनकी नज़र से पीने की हसरत तो रह गयी
मुद्दत हुई के अश्क पिये जा रहा हूँ मैं॥

मत पूछ, 'अश्क', पैरहने-ज़िन्दगी का हाल।
दामन है तार-तार, सिये जा रहा हूँ मैं॥

हे प्रिये, माझ्या ओठांवर रात्रंदिवस जे घोळत राहतं, ते नाव तुझंच आहे....एवढंच काय ?...माझी सकाळही तूच आहेस आणि माझी संध्याकाळही तूच आहेस...हे प्रिये, माझ्यासाठी तूच सर्व काही आहेस.

हे प्रिये, लैला–मजनूँसारख्या श्रेष्ठ प्रेमिकांच्या जगण्याचा हेतू होता प्रीती !....त्याच 'प्रीती'चा तू एक मधुर संदेश आहेस.

हे प्रिये, तुझ्या मादक नजरेनं पिल्यास काय विचारायचं !... नशेचा अंमल उतरणारच नाही. ...खरोखर, हे सुंदरी ! तारुण्याचा उसळता असा तू एक सुंदर चषक आहेस !

हे प्रिये, ईश्वराकडून मला मिळालेलं तू असं एक श्रेष्ठ वरदान आहेस, की ज्यास प्राप्त केल्यानंतर मला कशाचीही इच्छा राहिली नाही...मी तृप्त–तृप्त झालो आहे....हे प्रिये, तू प्राप्त झाल्यामुळं मी सर्व काही विसरलो आहे.

हे 'अश्क', पाहा, किती गंमत आहे !...अरे, ज्या सुंदरीमुळं तू सर्व जगात बदनाम झाला आहेस, त्या सुंदरीनं कधी तुझी विचारपूस केली आहे का ?...तूच सांग, ही किती दारुण शोकांतिका आहे !




लबोंपर है रोजो-शब जो नाम, तुम हो।
मेरी सुबह तुम हो, मेरी शाम तुम हो ॥

जो था लैला-मजनूँ के जीने का मक़सद
वो उल्फ़त का रंगीन पैग़ाम तुम हो ॥

निगाहोंसे पी लूँ तो नशा न उतरे।
छलकता हुआ एक हसीं जाम तुम हो ॥

जिसे पा के सब कुछ भुलाया है मैंने
खुदा की तरफ़से, वो ईनाम तुम हो ॥

कभी हाले-दिल, 'अश्क', पूछा है उसने।
के जिसके लिये आज बदनाम तुम हो ॥

दोस्तहो!....आमच्या जीवनाची दुर्दशा काय वर्णावी!... आधाराचे किनारे आमच्या नजरेपासून सतत दूर दूरच जात राहिले आणि जीवन-नौकेला, प्रत्येक लाटेगणिक नव्या संकटाच्या वादळवाऱ्याशी झुंजत राहावं लागलं....

हे बागवासीयांनों! जगात कोमेजण्याचंच दुसरं नाव उमलणं आहे!... कारण जी फुलं फुलतात, तीच कोमेजतात...जो जन्माला येतो, तोच मरतो...जन्म-मरण हा सृष्टीचाच नियम आहे... नियतीचाच खेळ आहे... मित्रहो, धरतीवरील सर्व सौंदर्य शेवटी नश्वर आहे, क्षणभंगुर आहे.

पिंजऱ्यात अडकलेला पक्षी म्हणतो, (उर्दू गजल–साहित्यात हे प्रतीक बऱ्याच वेळा वापरलं जातं.)
"मी पिंजऱ्यात इतका आक्रोश केला, इतका आक्रोश केला, की बागेतल्या प्रत्येक पानाचं हृदय कारुण्यानं हेलावून गेलं."

हे प्रिये! तुझ्या प्रीतीत हे कसलं आकर्षण आहे, काही कळत नाही!... पाहा, किती आश्चर्य आहे! ...मी हृदय गमावून बसलो, तरी इच्छा–आकांक्षा मात्र तशाच शिल्लक राहिल्या....वास्तविक हृदयाबरोबर इच्छा–आकांक्षाही हरवल्या पाहिजे होत्या; पण तसं घडलं नाही, हे आश्चर्यच नाही तर काय?....खरंच, हे प्रिये, तुझ्या प्रीतीचं हे केवढं मोठं सामर्थ्य आहे!

हे 'अश्क', जीवनाच्या अपूर्णतेची तक्रार उगीच करीत बसू नकोस. कारण तूच स्वतःच्या मनाशी थोडा विचार करून पाहा!...अरे, या जगात कोण पूर्ण होऊन आला आणि कोण पूर्णतेचा पुतळा बनून या जगातून गेला, तूच सांग! सर्वांच्याच जीवनाची कहाणी अपूर्ण आहे—मग व्यर्थ तक्रार का?



दूर नज़रों से मेरी साहिल गया ।
हर लहर कश्ती को तूफ़ाँ मिल गया ।

बाग़वालो, हुस्न है फ़ानी यहाँ ।
गुल–वही मुर्झा गया, जो खिल गया ।।

वो उठाया शोरे-मातम क़ैद में ।
पत्ता-पत्ता इस चमन का हिल गया ।।

क्या कशिश है, हाय, तेरे इश्कमें ।
बाकी रहे अरमाँ, गो दिल गया ।।

नामुरादीपर न रो, ऐ ‘ अश्क ’, तू ।
कौन क़ामिल आया, कौन क़ामिल गया ।।

पाहा, दोस्तहो, या प्रेम-रोगात किती अजब आनंद असतो!... या रोगाची रीतही मोठी अजबच आहे!...यात जो कोणी वेदना देतो, तोच त्या वेदनांचं औषध बनतो. दोस्तहो, पाहा, कसा चमत्कार आहे!.... कारण इतर रोगांच्या बाबतीत रोगाचं कारण वेगळं आणि औषध वेगळं असतं.

हे प्रिये! मला वाटतं, तुझ्याप्रमाणं तुझं स्वप्नही इमानदारीला त्रासलं असावं!... कारण ते देखील तुझ्याप्रमाणंच आमच्या दिशेला फिरकत नाही... आणि अशा अवस्थेत किती तरी दिवस उलटून जातात.

पंडित आणि मौलवी भक्तीची बढाई उगीच मारतात. आधी त्यांनी माझ्याप्रमाणं प्रेमस्वरूप तरी होऊन दाखवावं-ज्यांना प्रेमही जमलं नाही, त्यांनी भक्ती काय करावी! कारण प्रेम हीच भक्तीची पहिली पायरी आहे... म्हणून त्यांनी प्रथम प्रेमस्वरूप होऊन दाखवावं- हीच खरी भक्ती आहे-खरं पाहता, फक्त मंदिरात आणि मसजिदीमध्ये वास्तव्य करण्यात काय अर्थ आहे!... पण हे कोरडे पाषाण असणाऱ्या पंडित-मौलवींना कधी कळणार?

मित्रहो, तांड्याबरोबर सर्वजण चालत असतात; पण त्या गर्दीत एखादीच व्यक्ती अशी असते, की जिला 'मंजिल' (ध्येय) निश्चितपणे माहीत असते... 'गर्दी'त एखादाच 'दर्दी' असतो.

हे 'अश्क', माझ्या हातात मदिरेचा प्याला पाहून हे जग उगीचच मला नास्तिक म्हणतं... परंतु हे मूढ जन विसरतात, की ईश्वर तर प्रत्येक कणा-कणात आहे...मग तो मदिरेच्या प्याल्यातही असेलच ना!... मग मी नास्तिक कसा?...



आज़ारे–मुहब्बत में अजब लुत्फ़ो-मज़ा है।
जिसने दिया ये दर्द, वही आप दवा हैं ॥

आता नहीं मुद्दत हुई रातों में हमारी।
तेरी ही तरह ख़्वाब भी बेज़ारे-वफ़ा है ॥

मुझ जैसी मुहब्बत तो करें शेख़ो-बरहमन।
वैसे हरमो-दैरमें रह लेना भी क्या है ॥

इस राह में चलते हैं सभी काफ़िला सूरत।
पर एक ही होगा, जिसे मंज़िल का पता है ॥

हूँ जाम बक़फ़ लोग कहें, 'अश्क' है काफ़िर।
हर ज़र्रे में, वो भूल रहे हैं, के ख़ुदा है ॥

हे प्रिये, जेव्हा–जेव्हा ही लिहिलेली प्रेमपत्रं नजरेसमोर येतात, तेव्हा तेव्हा काय सांगावं! माझ्या मनात अनेक भावनांचा एक प्रलयच उसळतो... हे प्रिये, अशा प्रकारे तुझी पत्रं म्हणजे काही सामान्य बाब नव्हे!

माझ्या मनाशी असलेले तुझ्या पत्रांचे विविध संबंध काय वर्णवित! हे प्रिये, कधीकधी ही ‘प्रेमपत्रं’ मला काटे बनून बोचतात, तर कधी-कधी प्रभातसमयीचा शीतलवायू बनून माझ्या हृदयाची कळी हळुवार खुलवितात... हे प्रिये, तुझी प्रेमपत्रं अशा प्रकारे कधी दुःखदायकही ठरतात, तर कधी सुखकारकही वाटतात...काहीही असो, शेवटी माझ्या जीवनाशी तुझ्या प्रेमपत्रांचं अतूट नातं आहे, हेच खरं!...

हे प्रिये, कधी काळी आपल्या जीवनात किती आनंद होता, किती सुख होतं!... अहा! ‘ते दिवस’ म्हणजे सुवर्णाची जणू बरसात करणारेच होते!...हे प्रिये, माझ्याजवळ पडून असलेली तुझी प्रेमपत्रं, मला ‘त्या सुवर्णमय’ दिवसांचीच सतत आठवण देत राहतात... आणि मग मी वेड्यासारखा किती तरी वेळ, त्याच आठवणी उगाळीत बसतो... भूतकाळात हरवून जातो... उदासीनतेचं एक सावट मनावर किती तरी वेळ पडून राहतं.

हे प्रिये, आणखी काय सांगावं!...तुझी ही प्रेमपत्रं माझ्या हृदयात गतकालातील मधुर स्मृतींचा सुगंध पसरवीत राहतात... आणि...आणि हीच प्रेमपत्रं माझ्या डोळ्यांत स्वप्नं सजवीत राहतात.

हे प्रिये, तू विसरूनही गेली असशील, की ‘अश्क’ नावाचा कुणी, कधी काळी आपला प्रियकर होता! पण आम्ही मात्र ‘आपल्याला एक प्रेयसी होती,’ हे विसरू शकलो नाही... आजही आम्ही तू लिहिलेली प्रेमपत्रं छातीशी कवटाळीत बसतो... अगदी वेडेपिसे होऊन! खरोखर, अगदी वेडेपिसे होऊन!!...



जब भी नज़र के सामने आते हैं तेरे ख़त।
महशर-सा मेरे दिल में उठाते हैं तेरे ख़त ॥

काँटों की तरह चुभते हैं, पहलू में और कभी।
बनकर नसीम दिल को खिलाते हैं तेरे ख़त ॥

क्या लुत्फ़ था हयात में मौसम था ज़रफ़शाँ।
उन्ही दिनोंकी याद दिलाते हैं तेरे ख़त ॥

दिल में बिखेरते हैं तेरी याद की महक।
पलकों में मेरी ख़्वाब सजाते हैं तेरे ख़त ॥

तू भूल ही गया के कोई 'अश्क' था तेरा।
हम हैं के अब भी दिल से लगाते हैं तेरे ख़त ॥

दोस्तहो, पाहा! हृदयाच्या यातनांना, वेदनांना काव्याचं रूप दिलं गेलं... खरंच! या जगात दुःखालाही कशा कशा प्रकारे सजवलं गेलं आहे!

हे सुंदरी! तू म्हणजे ईश्वराच्या कलाकृतीची एक शानच आहेस! कारण तुझ्या फुलाप्रमाणे नाजूक शरीरात पाषाणाप्रमाणे कठोर असलेलं हृदय बसवलं आहे. शरीर फुलांचं आणि हृदय मात्र पाषाणाचं! हा विरोधाभास म्हणजे एक आश्चर्यच नव्हे काय?

मित्रहो! आम्ही आयुष्यभर तांड्याबरोबर चालत राहिलो. पण हाय, रे, दुर्दैवा! मंज़िलचं (इच्छित स्थळाचं) चिन्हदेखील कधी आमच्या नजरेस पडलं नाही. आम्ही आयुष्यभर फक्त चालतच राहिलो!

हे धर्मोपदेशका, ईश्वराचं अस्तित्व तर विश्वाच्या कणाकणांत भरून उरलं आहे. मग गल्लो-गल्लीत मंदिरं बांधण्याचा व्यर्थ खटाटोप का?

हे 'अश्क', 'प्रेम' हा काही आजचाच रोग नाही. आजचंच रडणं-कुढणं नाही, आजचीच समस्या नाही. विश्वाच्या आरंभापासून चालत आलेली ही समस्या आहे. जरा विचार करून पाहा, 'आदम'लाही प्रेमाचा गुन्हा केल्यामुळंच स्वर्गातून हाकलून देण्यात आलं होतं.



दर्दे–दिल को गीत बनाया गया ।
कैसे कैसे ग़म को सजाया गया ॥

तू भी, ऐ बुत, क्या खुदा की शान है ।
दिल-सा पत्थर गुल में लगाया गया ॥

उम्रभर थे कारवाँ के साथ हम ।
संगे-मज़िल पर न दिखाया गया ॥

ज़र्रे-ज़र्रे में खुदा है, बरहमन ।
कू-ब-कू क्यों दैर बनाया गया ॥

'अश्क', उल्फ़त आज का रोना नहीं ।
खुल्द से आदम भी उठाया गया ॥

मित्रांनो! काय सांगायचं! त्या अलौकिक सुंदर प्रियेच्या मीलनाची मधुर बहार आमच्या जवळ दरवळत होती. आता ही कालचीच तर गोष्ट आहे. दोस्तहो! त्या वेळचं सुख ते काय वर्णावं!... विरहही नव्हता आणि प्रतीक्षाही नव्हती. आता ही कालचीच तर गोष्ट आहे.

त्या प्रियेनं आम्हांला सोडून दुसऱ्यालाच आपलंसं करून घेतलं. न जाणो, तिनं असं का केलं? काय सांगावं! कधी काळी माझ्यावरही तिचा पूर्ण विश्वास होता, हो! आता ही कालचीच तर गोष्ट आहे.

मित्रांनो! आता माझं भेटणं, न भेटणं त्या प्रियेला सारखंच झालं आहे. पण खरं सांगू! कधी काळीं याच प्रियेला, मनापासून माझीच प्रतीक्षा असायची! आता ही कालचीच तर गोष्ट आहे.

दोस्तहो! आज त्या सुंदरीच्या नयनांत माझ्यासाठी सहानुभूतीचा एकही अश्रू उरलेला नाही. आपला विश्वास बसणार नाही; पण हीच प्रिया कधी काळी माझ्यासाठी स्फुंदून स्फुंदून रडायची. आता ही कालचीच तर गोष्ट आहे.

हे 'अश्क', आज तिच्यासमोर कुणी सहज माझं नाव घेतलं, तरी ती प्रिया जाणून-बुजून विषय टाळते. पण कधी काळी हीच प्रिया माझं नाव वारंवार घेण्यात भूषण मानायची, माझ्यावर जिवापाड प्रेम करायची. अहो, आता ही कालचीच तर गोष्ट आहे.




थी पास वो बहार, अभी कल की बात है ।
था मेरा ही वो यार, अभी कल की बात है ॥

क्यूँ जाने उसने ग़ैर को अपना बना लिया
था मेरा एतबार, अभी कल की बात है ॥

अब मेरा मिलना और न मिलना है एक-सा ।
था उनको इन्तज़ार, अभी कल की बात है ॥

आँखों में उनकी नहीं आँसू मेरे लिए ।
रोते थे ज़ार-ज़ार, अभी कल की बात है ॥

अब, 'अश्क', टाल देते हैं पहले वो मेरा नाम ।
लेते थे बार-बार, अभी कल की बात है ॥

मित्रांनो ! या जीवन-मार्गावरून आम्ही सतत चालतच राहिलो ! काय सांगावं ? या प्रवासात पावला-पावलावर आम्ही ठेचाळतच राहिलो आणि संकटांच्या गर्दीत पावला-पावलावर स्वतःला सावरीतच राहिलो.

दोस्तहो, पाहा !

जीवनाच्या या मायाबाजारात मृगजळामागं धावण्यातच आमचं आयुष्य गेलं. हाती काहीच लागलं नाही... तृष्णा वाढतच राहिली आणि आम्ही पश्चात्ताप करीत राहिलो. व्यर्थ धावपळ करीतच राहिलो.

मित्रांनो ! जरा पाहा ! फुलणाऱ्या फुलांची अखेर केवढी प्राणघातक असते ! वास्तविक, फुलं फुलल्यामुळंच कोमेजतात. ही परिस्थिती कळ्या पाहतच असतात. तरीही कळ्या फुलण्यासाठी, हसण्यासाठी उत्सुक, असतातच, हे किती आश्चर्य आहे !

( जुन्या पिढ्या संपतात, म्हणून काही नवीन पिढ्या यायच्या थांबत नाहीत. त्या नवीन पिढ्यांत असणारे नवनवोन्मेषही संपत नाहीत. चैतन्य-शीलता हा सृष्टीचा नियमच आहे. शेवटी ब्रह्म्याचा चिद्विलास म्हणजेच विश्व होय ! येथे निर्मिती-लय, लय-निर्मिती हा क्रम अखण्ड चालूच राहणार. )

मित्रांनो ! कधी कधी वाटतं, आम्ही जर दिव्याची ज्योत झालो असतो, तर बरं झालं असतं ! कारण, त्यामुळं आम्हांला फक्त रात्रभरच जळत राहावं लागलं असतं. पण हाय, रे, दुर्दैवा ! प्रेमिक झाल्यामुळं आमची हानीच झाली. कारण त्यामुळं आम्हांला आयुष्यभर दुःखात, यातना-वेदनांतच जळत राहावं लागलं !...

हे ' अश्क ', आम्ही तर आमच्या जीवनाचा एकच रंग कायम ठेवला. तो म्हणजे प्रामाणिकपणा ! पण आमच्या सभोवतालचे बेइमान लोक मात्र सरड्याप्रमाणे क्षणाक्षणाला रंग बदलतच राहिले !....




हम राहे-ज़िन्दगानी पे चलते रहे ।
हाय ! गिरते रहे और संभलते रहे ॥

हम सुराबों के पीछे रहे उम्रभर ।
प्यास बढ़ती रही, हाथ मलते रहे ॥

किस क़द्र जानलेवा है अंजामे-गुल ।
फिर भी गूँचे हँसी को मचलते रहे ॥

काश होते शमअ, जलते, बस, एक शब ।
हम तो आशिक़ हैं ता-उम्र जलते रहे ॥

'अश्क', अपना है बस एक रंगे-वफ़ा ।
लोग थे बेवफ़ा, रंग बदलते रहे ॥

हे प्रिये ! तुझ्या दुःखापासून मी स्वतःचा पदर वाचवून घेतल्यास, सावरून घेतल्यास बरं होईल ! मी तुझ्या विचारांच्या वादळात पुरता सापडलो आहे. आता अलिप्ततेचा किनारा मिळाल्यास बरं होईल !

हे प्रिये ! माझ्या दुःखांची, यातनांची, वेदनांची जाणीव तुला कशी व्हावी ? कारण तू तर पाषाणहृदयी आहेस. म्हणूनच आता मीही माझं हृदय पाषाणाचं करून घेतल्यास बरं होईल !... म्हणजे मी तुझ्याप्रमाणं बेफिकीर, सुखी होऊ शकेन !

हे प्रिये ! तुझा पदर अश्रू पुसण्यास नसेल, तर रडण्यात तरी काय मजा ? म्हणून मी आपल्या आसवांना पापण्यांतच गोठवून टाकल्यास बरं होईल !

हे प्रिये ! आज तू प्रीतीपासून फार दूर निघून गेली आहेस. माझ्याही मनात विचार येतो....आपणही एखादं असंच पाऊल उचलावं, तेच बरं !

हे 'अश्क' ! त्या प्रियेच्या मैफलीत मी फार बदनाम झालो आहे. इतका बदनाम झालो आहे, की कुणाला चेहराच दाखवावासा वाटत नाही ! म्हणूनच आता प्रेतवस्त्रातच चेहरा लपवून घेतल्यास बरं होईल !




तेरे ग़म से दामन बचा लूँ, तो अच्छा ।
किनारा मैं तूफ़ाँ में पा लूँ, तो अच्छा ॥

मेरे दर्द का तुझको अहसास क्यूँ हो ।
मैं अब दिल को पत्थर बना लूँ, तो अच्छा ॥

नहीं तेरा आँचल तो रोनेसे हासिल ।
मैं पलकों में आँसू छुपा लूँ, तो अच्छा ॥

गये मंज़िले-इश्क से दूर जब तुम ।
क़दम मैं भी ऐसा उठा लूँ, तो अच्छा ॥

मैं उस बज़्म में, 'अश्क', रुसवा बहोत हूँ ।
कफ़न में ही चेहरा छुपा लूँ, तो अच्छा ॥

हे प्रिये ! जेव्हा लाजत मुरडत तू घराच्या सज्जावर येऊन उभी राहिलीस, तेव्हा फूल, दवबिंदू, चंद्र, सूर्य–ओठांवर अशी कितीतरी नावं झळकून गेली.

ठीक आहे ! मला मान्य आहे, की माझं तुझ्याशी काहीच नातं नाही ... मग तूच सांग, हे प्रिये ! सकाळ-संध्याकाळ प्रत्येक क्षणी तू मला का आठवतेस ? माझ्या स्मृतीच्या अंगणात नकळत, हळुवारपणे का उतरतेस ? आपलं कोणतंच नातं नाही, तर असं घडावं तरी का ? तूच सांग !...

मित्रहो, जीवनात मी कुठं थांबलोच नाही... सतत चालतच राहिलो. कारण चालणं हेच माझं ध्येय होतं ! तसं पाहता, एखाद्या ठिकाणी स्थिर व्हावं, थांबावं, अशी कितीतरी स्थळं मार्गात आली, दृष्टीस पडली; पण मी थांबलोच नाही. जीवनमार्गावरून सतत चालतच राहिलो...

हे प्रिये ! मला मदिरेच्या सुरई–प्याल्याशी काय कर्तव्य ?... कारण तुझ्या एका मादक नजरेतूनच मदिरेच्या किती तरी प्याल्यांची मादकता मला लाभली आहे. मग निर्जीव सुरई–प्याल्यांना कोण विचारणार ?

हे ' अश्क ', माझ्या कविता व्यर्थ आहेत.

उपयुक्ततेच्या दृष्टीनं त्यांची जीवनात काही किंमत नाही. तरी पण दोन घटका त्यांमुळं रसिकांचं मनोरंजन झालं ! हे तरी काय कमी आहे ?....

माझ्या कवितांमुळं जगात काही भव्य-दिव्य घडलं नसलं, तरी हेही नसे थोडकं !



फूल, शबनम, माहो-अंजुम-लब पे क्या नाम आ गये ।
आप शर्माते, लजाते जब लबे-बाम आ गये ।।

मैंने माना, आपसे मेरा कोई रिश्ता नहीं ।
याद, क्यों कहिये, मुझे फिर सुब्हो-शाम आ गये ।।

मैं कहीं रुकता नहीं, चलना ही है मंज़िल मेरी ।
रुक के दम लेने के हक़में कितने ही गाम आ गये ।।

क्या ग़रज़ मुझको मेरे जामो-सुबू से, साक़िया ।
हाय, तेरी एक नज़र से कितने ही जाम आ गये ।।

मैंने माना, 'अश्क', ये शेर हैं मेरे फ़ुज़ूल ।
दिल को बहलाने की ख़ातिर ये बहोत काम आ गये ।।

दोस्तहो! हा दैवदुर्विलास तर पाहा! सुखाच्या शोधात मला दुःखच दुःख मिळालं...पण चालायचंच! जीवनात सुखी तरी कोण आहे?... जीवनाचे हे मार्ग शेवटी कुणाला सुखकारक ठरले आहेत?

हे ईश्वरा! काट्यांविरुद्ध माझी कोणत्याच प्रकारची तक्रार नाही. कारण जीवनभर जखमा झाल्या, त्या फुलांमुळंच!...मग काट्यांविषयी उगाच रोष का बाळगावा?...

हे प्रिये! जीवनाच्या मार्गावरून चालताना, माझ्यासमवेत तू जरी नसलीस, तरी मी एकाकी आहे च कोठे? कारण या प्रवासात तुझ्या मधुर स्मृतींच्या सुखदायक सावल्या पावलापावलावर माझी सोबत सतत करीतच आहेत. हे प्रिये! मी एकाकी आहेच कोठे?....

हे प्रिये! तुझ्या यौवनाची व लावण्याची बहार काय वर्णावी! तुझ्या अद्वितीय सौंदर्यामुळंच जणू वातावरणात चित्ताकर्षक, नयनमनोहर रंग उसळतात आणि फुलांचे अगणित तांडे मधु-मधुर हसतात!

हे 'अश्क', परके तर परकेच होते! त्यांच्याविरुद्ध तक्रार ती कसली? खरं तर या जगात ज्यांना आपलं मानलं, तेही परकेच निघाले! मग उगाच तक्रार कशाला करायची?




खुशी की चाह में रंजो-अलम ही पाये हैं।
राहे-हयात कहाँ सबको रास आये हैं ॥

मेरे खुदा, मुझे काँटों से कब शिकायत हैं।
गुलों की चाह में कितने ही ज़ख्म खाये हैं ॥

राहे-हयात में तनहा कहाँ हूँ मैं हमदम।
के मेरे साथ तेरी याद के भी साये हैं ॥

तेरे बदन की बहारें भी क्या बहारें हैं।
हवा में रंग उडे, फूल मुस्कुराये हैं ॥

गिला हो किस तरह, ऐ 'अश्क', हमको गै़रोंसे ?
के इस दयार में अपने भी सब पराये हैं ॥

कधी ज्वाला, तर कधी दवबिंदू ! कधी आग, तर कधी पाणी ! हे प्रिये ! खरोखर तुझं हे सौंदर्य म्हणजे एक चमत्कारच आहे !

अशा अलौकिक सौंदर्याकडे मन आकर्षित न झालं, तरच नवल !

मित्रहो ! ईश्वरानं निर्माण केलेली ही जगाची बाग म्हणजे एक आश्चर्यच आहे ! या बागेत फुलणारी जीवनरूपी असंख्य फुलं मृत्यूच्या पाशवी हाताखाली चुरगळली जातात–संपून जातात. तरी पण या बागेची शोभा मात्र कायमच आहे ! उजाड होऊ पाहणारी ही बाग कधीच उजाड होत नाही. जीवन या ठिकाणी नश्वरही आहे आणि अमरही आहे ! जीवनाच्या भरती–ओहोटीचा खेळ या बागेत अखंडपणे चालूच आहे !...

दोस्तहो ! माझ्या प्रेमाची चर्चा सर्वांच्या कुतूहलाचा विषय आहे. प्रत्येकाच्या बोलण्याचा विषय आहे. म्हणूनच ही चर्चा कधी वास्तवाधिष्ठित असते, तर कधी ती केवळ कल्पनाधिष्ठित असते.

या जगरूपी बागेत आपण फुलतो आणि कोमेजून पडतो. हे जीवन ही घटना ही किती अजब आहे ! तिच्यात आगमनही आहे आणि निर्गमनही आहे.

हे ' अश्क ' ! त्या सुंदरीच्या प्रेमानं आम्हांला बरबाद केलं. पण याबद्दल मला मुळीच वाईट वाटत नाही. कारण आमचं तारुण्यही यात काही अंशी दोषी आहे. आमचं तारुण्यही प्रलयाप्रमाणं जोशपूर्ण नसतं, तर हा दिवस का ओढवला असता ?



शोला भी है, शबनम भी, है आग भी, पानी भी ।
ऐ दोस्त, अजब कितनी ये तेरी जवानी भी ॥

मिटकर भी नहीं मिटता गुलज़ारे-जहाँ तेरा ।
है ज़ीस्त ये बाकी भी, है ज़ीस्त ये फानी भी ॥

चर्चे मेरी उल्फत के हर एक की ज़बाँपर हैं ।
कुछ इसमें हक़ीक़त है, कुछ इसमें कहानी भी ॥

मुर्झाते हैं, खिलते हैं इस बाग़े-जहाँ में हम ।
है चीज़ अजब हस्ती आनी भी है, जानी भी ॥

कुछ उसकी मुहब्बत ने बरबाद किया हमको ।
ऐ 'अश्क', क़यामत थी कुछ अपनी जवानी भी ॥

रात्रही ढळू शकली नाही आणि क्षितिजावर प्रभातही उतरू शकली नाही. मित्रांनो ! विरहरात्रीची अवस्था काय वर्णावी ! विरहाची रात्र म्हणजे साक्षात प्रलयाचीच रात्र ठरली !

दोस्तहो, आम्ही आमच्या मनाला लाखदा सावरलं ! पण व्यर्थ ! त्या 'प्रिये'चा विषय मनात येतच राहिला. काय सांगावं ! तिला विसरण्याचा प्रयत्नही लाखदा केला. पण ... पण ... त्या 'प्रिये'चा स्मृति–सुगंध रात्रभर दरवळत राहिला.

हे प्रिये, 'विरहाची रात्र कशी व्यतीत झाली ?' हे तू आम्हांला विचारू नकोस. खरोखर त्या विरहाच्या रात्री आम्ही किती एकाकी होतो ! त्या यातनादायी रात्री झोपही आली नाही आणि तूही आली नाहीस ! विरह-वेदनांत आम्ही सारखे तळमळतच राहिलो. अशा विरहरात्रीचा वृत्तान्त विचारून आमच्या जखमांवर मीठ कशाला चोळतेस !

मित्रांनो ! हे मनुष्य-जीवन म्हणजे आहे तरी काय ? काही नाही ! ती फक्त दोन दिवसांची एक कहाणी आहे. खरंच, जीवन किती नश्वर आहे ! जीवन मिळतं, न मिळतं, तोच मृत्यूचं बोलावणंही येतंच ! ही दोन दिवसांची एक कहाणी आहे.

एकदा कुणीतरी सहज मला विचारलं,

'हे 'अश्क'! मित्रा, प्रेम म्हणजे काय ?...सांग तरी !'

या प्रश्नाला उत्तर देण्याचा मी प्रयत्न करू लागलो; पण व्यर्थ ! माझी जिव्हा काही बोलूच शकली नाही...आणि नकळत माझे डोळे भरून आले !

कदाचित विचारल्या गेलेल्या प्रश्नाचं 'उत्तर' हेच असावं !



ढ़ली न रात, न तो सुबह ही उतर आयी ।
शबे-फिराक़, क़यामत की शब नज़र आयी ॥

हज़ार ज़ब्त किया, दिल मगर नहीं माना ।
भुलाया लाख, मगर याद रातभर आयी ॥

न पूछ, कैसे कटी रात हिज्र की, ऐ दोस्त ।
न नींद आयी हमें, और न फिर सहर आयी ॥

ये आदमी है क्या, दो दिन की एक कहानी है ।
मिली हयात कल, आज मौत की ख़बर आयी ॥

किसी ने पूछा, मुहब्बत है क्या बता, ऐ 'अश्क',
ज़बान कह न सकी, बस, आँख भर आयी ॥

दोस्तहो, माझी वार्ता मृत्यूपर्यंत पोहोचायला फार उशीर झाला... इतका उशीर झाला, की जीवन विष होईपर्यंत कंठावं लागलं, जगावं लागलं.

मित्रांनो, लाभ होताच दूर होणं ही तर जगाची रीतच आहे. पाहा, स्वातीचे जलबिंदूही शिंपल्यात राहतात... पण मोती होईपर्यंतच ! शेवटी, जगात स्वार्थ कुणाला सुटला आहे ?

( पिंजऱ्यात अडकलेला पक्षी म्हणतो ), बंदिवान होण्याच्या दुःखात मी इतकं रडू शकलो असतो, तर बरं झालं असतं. माझ्या अश्रूंच्या पुरात पिंजरा आणि शिकारी दोघेही वाहून गेले असते. खरोखरच असं झालं असतं, तर बरं झालं असतं ! निदान अशानं तरी ' मुक्ती ' मिळाली असती.

मित्रांनो, चला ! सुरई आणि प्याल्यानंच आपण आपल्या मनाचं रंजन करून घेऊ ! घाबरू नका, वाईट वाटून घेऊ नका ! ... हे मनोरंजन फक्त मदिराक्षीचा एक मादक दृष्टिक्षेप आपल्यावर पडत नाही, तोपर्यंतच आपण करणार आहोत. एकदा, त्या सुंदरीच्या नयनांचे प्याले प्राप्त झाल्यावर या क्षुद्र सुरई–प्याल्याशी कोण खेळत बसणार ?

हे ' अश्क ', विरहाच्या रात्रीचा वेदनादायी दुःखद वृत्तान्त त्या प्रियेला आम्ही जरूर ऐकवू ! पण कधी ? सकाळ होईपर्यंत कदाचित आम्ही जिवंत राहिलो, तरच !



मौत को देर हुई मेरी ख़बर होनेतक ।
ज़ीस्त के साथ निभाई है ज़हर होनेतक ॥

फ़ैज़ पाते ही हुए दूर, ये हैं रस्में-जहाँ ।
सीप में होता है क़तरा भी गुहर होनेतक ॥

कफ़सो-सैद भी बह जाते मेरे अश्कों में ।
काश, रो सकता मैं इतना तो असर होनेतक ॥

जामो–मीनासे, चलो, दिल को जरा बहला लें ।
एक नज़र साक़िये–गुलगू की नज़र होनेतक ॥

हिज्र की रात का अफ़साना सुनायेंगे उन्हें ।
'अश्क', गर साँस चले अपनी सहर होनेतक ॥

दोस्तहो, माझी प्रीत त्या प्रियेला हळूहळू असं काही अस्वस्थ करून टाकील, की बस ! मग काय, सुवर्ण–वर्षावाप्रमाणे वैभवशाली असणाऱ्या त्या 'प्रिये'ची पावलं आपोआपच माझ्याकडे वळतील !

मित्रहो, एक काळ नक्कीच असा येईल, की मंदिर-मसजिदींचा उदो-उदो न होता फक्त 'माणसा'लाच पुजले जाईल. मग जगाच्या बुरसटलेल्या रूढि परंपरा, कालांतरानं का होईना, हळूहळू बदलत जातील.

दोस्तहो, ही तर दुःखांनी भरलेली विरहाची रात्र आहे... म्हणूनच, स्नेही जनहो, आता तुम्ही इतकंच करा, मधुर वाद्यं उचला, मदिरेचे मादक प्याले भरा ! मग आपोआपच हळूहळू व्याकूळ हृदयाला आराम मिळू लागेल ! बरं वाटू लागेल.

मित्रांनो, त्या सुंदरीनं गप्पागोष्टींच्या ओघात माझा उल्लेख केला, तरी तुम्ही माझा विषय टाळा. कारण शब्दानं शब्द वाढत जाऊन, एकातून एक अशा हजार गोष्टी हळूहळू उगीचच निघत राहतील. त्यापेक्षा 'ते' टाळलेलंच बरं !

हे 'अश्क', जगाच्या या मायाबाजारातील खोट्या झगमगाटाच्या वैभवात मन गुंतवावं तरी कसं ? कारण आम्हांला माहीत आहे, प्रत्येक समृद्धी, प्रत्येक बहार हळू-हळू पतनाच्या दिशेनंच प्रवास करीत असते. एक ना एक दिवस नाश पावत असते. मग त्यात मन गुंतवून तरी काय उपयोग ! व्यर्थच ते !



मुहब्बत यूँ करेगी बेक़रार आहिस्ता आहिस्ता ।
के खींचकर आयेगा वो ज़रनिगार आहिस्ता आहिस्ता ।।

बजाये दैरो-क़ाबा सिर्फ इन्साँ पूजे जायेंगे ।
बदलती जायेगी ये रस्मे-दयार आहिस्ता आहिस्ता ।।

शबे–फ़ुर्क़त, यारों, साज़ छेडो, जाम छलकाओ ।
सँभऊ ही जायेगा दिल बेक़रार आहिस्ता आहिस्ता ।।

अगर वो ज़िक्र मेरा छेड दे, तो टाल दो, यारों ।
अबस ही निकलेगी बातें हज़ार आहिस्ता आहिस्ता ।।

दहर ही रौनकों से, ‘ अश्क ’, कैसे दिल लगायें हम ।
खिजाँ का रुख लेती है बहार आहिस्ता आहिस्ता ।।

हे प्रिये, तू तर दररोजच सुखाच्या सागरात निद्रिस्त होतेस. 'निद्रा न येणं' हा दुःखद अनुभव तुला कसा असणार ? हे सुंदरी, तू तर नेहमीच आनंदात मग्न असतेस. तुला विरहाच्या यातनादायी गोष्टी काय माहीत ?

हे प्रिये, तू जणू एक अप्सराच आहेस ! म्हणूनच कदाचित तू जगापासून लांब–कुठं तरी दूर-दूर अशी राहतेस. अशा अवस्थेत मानव होऊन मानवाशी संबंध ठेवणं तुला काय माहीत ?

हे प्रिये, तुझ्या नयनांना नयन म्हणावं तरी कसं ? ते तर प्रत्यक्ष हिरे-मोतीच आहेत. मग, आता तूच सांग ! अशा नयनांना दुःखात बुडून अश्रू ढाळणं काय माहीत ?

पाठ फिरवून माझ्यापासून दूर निघून जाणाऱ्या हे निष्ठुर सुंदरी ! तुझ्याबद्दल तक्रार तरी कशी करावी ? कारण मला माहीत आहे, तुला हृदयच नाही. मग प्रेमभरानं एखाद्याला 'हृदयदान' करणं तुला काय माहीत ?

हा 'अश्क:' तर एक वेडाच आहे ! नेहमीच त्या 'बेइमान' प्रेयसीला आठवत बसतो. तिच्याच स्मृती उगळीत बसतो– हा वेडेपणाच नव्हे, तर काय ! कारण अशा सुंदरीला आठवण्यात तरी काय अर्थ आहे, की जी स्वप्नात येण्याचंही टाळत असेल ! मग अशा सुन्दरीला प्रत्यक्षात संमुख येणं काय माहीत ?



ऐ चैनसे सोनेवाले, तू नींदोंका उडाना क्या जाने ।
मसरूर जो हरदम रहता है, हिज्र का फ़साना क्या जाने ॥

तू तो है परी, रहती है कहींपर, दूर बहोत, दुनियासे अलग ।
इन्साँ की तरह, इन्साँनोंसे रब्त निभाना क्या जाने ॥

आँखे तो नहीं हैं ये तेरी, ये लालो-गुहर है हमदम ।
अब तू ही बता, दर्दो-ग़म में तू अश्क बहाना क्या जाने ॥

मुँह फेर के जानेवाले, मुझे तुझसे तो नहीं शिकवा कोई
सीने में नहीं जब दिल ही तेरे, तू दिल का लगाना क्या जाने ॥

ये 'अश्क' तो एक दिवाना, तकता है सदा उसकी राहें ।
जो ख्व़ाब से भी कतराता हो, वो सामने आना क्या जाने ॥

दोस्तहो, आता कोणतीही इच्छा राहू नये, हीच एक इच्छा आहे. आता कोणताही शोध राहू नये, हाच एक मला शोध आहे. (मुक्त होता होता अडकून पडणं– हाच, जीवना, मानवी मनाचा विशेष आहे– अध्यात्मात 'मायावाद' यासच म्हणतात.)

हे प्रिये, माझ्या मनात तुझ्यासमवेत, माझा प्रतिस्पर्धीही निवास करतो. कसं ? म्हणशील, तर ऐक ! माझ्या मनात तू आहेस आणि तुझ्या मनात 'तो' आहे. अशा प्रकारे आपोआपच माझ्या प्रतिस्पर्ध्याला माझ्या मनात जागा मिळाली आहे.

(तुझ्यामुळंच मला त्याच्याविषयी सहानुभूती आहे !)

हे प्रिये, तुझं हे सुंदर शरीर म्हणजे बहारीच्या, सौंदर्याच्या वास्तव्याचं जणू एक घरटंच आहे. तुझ्या सहवासात मीही रंग आणि सुगंध यांमुळं नुसता बहरतो आहे, दरवळतो आहे.

हे प्रिये, तुझे करकमल मेंदीमुळं लाल झाले आहेत, असं लोक उगीच म्हणतात. आपल्या हातांनी माझं हृदय तू कुसकरून टाकलं आहेस. तोच रक्ताचा लाल रंग तुझ्या हातावर खुलला आहे !...

हे 'अश्क' ! आता तूच उठून आपल्या प्रभावी सुंदर रंगीत गजलची जादू सगळीकडे पसरवून टाक. मैफलीचीही हीच इच्छा आहे. कारण या मैफलीच्या नजरेत आज फक्त तूच तू आहेस.



कोई आरज़ू न हो अब, यही मेरी आरज़ू है ।
कोई जुस्तज़ू न हो अब, यही मेरी जुस्तज़ू है ॥

मेरे दिल में है अदू भी तेरे साथ-साथ, ज़ालिम ।
मेरे दिल में तू ही तू है, तेरे दिल में बस अदू है ।

ये तेरा हसीन पैकर है बहार का नशेमन ।
मैं महक रहा हूँ तुझसे, मेरे साथ रंगो-बू है ॥

जिसे लोग कह रहे हैं तेरा हाथ है हीनाई ।
मेरा दिल जो तूने मसला, हाथ में वही लहू है ॥

तू ही, 'अश्क', अब जगा दे रंगीं ग़ज़ल का जादू
के निगाहे-अंजुमन में फ़क़त आज तू ही तू है ॥

प्रत्येक श्वासोच्छ्वासागणिक तिची आठवण सतत येत राहते. ‘प्रेम’ ‘प्रेम’ म्हणतात, ते हेच तर नाही ना? मित्रांनो! या गोष्टी जरा कुणी विस्तारानं समजावून देईल काय?

हे प्रिये, रात्री तुझी स्वप्नं सतावतात आणि दिवसा तुझे विचार येत राहतात. अशा बिकट परिस्थितीत तूच सांग, आम्ही काय करावं? खरोखर कुणी कुणाला इतकं सतावू नये.

दोस्तहो, पाहा, हा काय अजब न्याय आहे!... सौंदर्याचा आनंद डोळे लुटतात आणि त्या बदल्यात जखमी होतं, ते मात्र हृदय! वा! गुन्हा करतो कोण आणि सजा मिळते कुणाला!

प्रीतीचा मार्ग सोडून आम्ही इतर कुठंही जाणार नाही. मग मंदिर-मसजिद निमंत्रण देवो, की आणखी कुणी साद घालो!...प्रीतीपासून आम्ही तसूभरही ढळणार नाही.

हे ‘अश्क’, आता मृत्यू आला, तरी मी त्यालाही प्रेमानं छातीशी कवटाळीन. कारण कुणीतरी आपल्या जवळ यावं, अशी तीव्र इच्छा कितीतरी दिवसांपासून माझ्या मनात वास करीत आहे.




साँस के साथ लगातार जो याद आये कोई ।
ये मुहब्बत तो नहीं है ? हमें बतलाये कोई ॥

रात में ख़्वाब तेरे, दिन में तसव्वुर तेरा ।
नाज़नीं, इतना किस को न सताये कोई ॥

लज़्ज़ते-हुस्न मिले आँख को, दिल ज़ख्मी हो ।
जुर्म करता है कोई और सज़ा पाये कोई ॥

छोडकर इश्क की राहों को नहीं जायेंगे ।
हरमो-दैर बुलाये के बुलाये कोई ॥

मौत भी, 'अश्क', जो आये, तो लिपट जाऊँगा ।
अपनी मुद्दतसे तमन्ना है, के पास आये कोई ॥

हे पत्रवाहका ! तू घेऊन गेलेल्या 'त्या' पत्राऐवजी आम्हांलाच ह्या पत्राचं भाग्य लाभलं असतं, तर किती बरं झालं असतं ! कारण 'ते' पत्र त्या सुन्दरीनं घरातच ठेवून दिलं आहे. (पण पत्राचं भाग्य आम्हांला कुठून लाभणार ?)

दोस्तहो, आमच्या मनाची श्रद्धास्थानं काही वेगळीच आहेत. म्हणूनच, मंदिरासमोर किंवा मसजिदीसमोर आमची मान कधीही झुकली नाही.

दोस्तहो, सकाळ होताच एकीकडे दिव्याची ज्योत मालवली आणि एकीकडे आमची प्राणज्योत मालवली. चला, बरं झालं ! विरह-रात्रीच्या दुःखातून आम्ही दोघंही एकदाचे मुक्त झालो.

हे उपवनवासीयांनो ! सुखाचं घरटं तुम्हांला मिळाल्याबद्दल तुमचं अभिनंदन असो ! आमच्याबद्दल काही विचारू नका. आमच्यासारख्या दुर्दैवी जीवांसाठी पिंजरा हेच 'घर' झालं आहे.

हे 'अश्क', दुःखाची तक्रार ईश्वराजवळ काय करावी ! कारण फक्त दुःखच काय ते संपूर्ण आयुष्यभर जिवलग मित्र म्हणून राहिलं आहे ! मग त्याच्याविरुद्ध तक्रार करण्यात काय अर्थ आहे ?




ख़त ले के रख दिया है जो नामाबर हमारा।
ऐ काश, ख़त के बदले होता गुज़र हमारा॥

कुछ और ही रहा है मरकज़ अक़ीदतों का।
दैरो-हरम में झुकता कैसे ये सर हमारा॥

एक साथ सुबह छूटे शबे-ग़म से, हाय, दोनों।
बुझी शम्अ उस तरफ़, तो टूटा दम इधर हमारा॥

अहले-चमन, हो तुमको ये आशियाँ मुबारक।
पूछो न अब, क़फ़स है, गोया, घर हमारा॥

क्या कीजे शिकवा ग़म का, ऐ 'अश्क', अब ख़ुदा से।
वो ही तो आशना है एक उम्रभर हमारा॥

हे प्रिये, माझे डोळे, माझं हृदय-सर्वच तुझी अपेक्षा करतात. खरं तर असं करण्याची काहीच आवश्यकता नाही. कारण मी जिथं-जिथं नजर टाकतो, त्या-त्या ठायी तूच तू दिसतेस ! मग पुन्हा अपेक्षा करण्याचं काय कारण ?

मंदिर आणि मसजिदी ही ईश्वराची निवासस्थानं नाहीत. खरं पाहता हृदयातच ईश्वर असतो ! तेच त्याचं खरं निवासस्थान आहे. मग, चला. हृदयापर्यंतच पोहोचण्याचा आपण प्रयत्न का करू नये ! ( इतरांचं हृदय जाणून घेणं हीच खरी भक्ती होय, आणि ईश्वर कर्मकांडापासून दूर आहे–ही दोन तत्त्वं जगाला कळाल्यास मानवजात पुष्कळ अंशी सुखी होईल, असं वाटतं. )

मान्य आहे, मित्रांनो ! ( जनरूढीप्रमाणे ) प्रेम हा गुन्हा आहे. तरीही खरं पाहता हाच एक स्वर्ग आहे. म्हणूनच या ! आज ' आदम 'नं केलेला ' तो 'च प्रेमाचा गुन्हा आपण परत एकदा करू या !

( 'आदम'नं प्रेमाचा गुन्हा केला, म्हणूनच त्याला स्वर्गातून हाकलण्यात आलं; पण प्रेमाचा गुन्हा करणं म्हणजेच स्वर्गसुख होय ! हे रहस्य ज्या भाग्यवंतांना कळालं, त्यांना स्वर्ग मुकल्याचं दुःख ते काय होणार ? )

दोस्तहो !

आपला ' काफिला ' ( तांडा ) इच्छित स्थळापर्यंत ( मंजिल ) पोहोचेल, की नाही, हे काही सांगवत नाही. तरीही चालत राहणं आपलं काम आहे. आपण चालतच राहिलं पाहिजे.

( जीवनात माणसानं फळाची अपेक्षा न करता कार्य करीत राहावं ! )

हे ' अश्क ', आता माझं जीवन आहे आणि सभोवताली पसरलेला हा जगाचा बाजार आहे ! आता जे काही ईश्वर घडवील, ते ते आपण पाहत राह्यचं. बस्स !( त्यापेक्षा जास्त दुर्बल मानवाच्या हाती आहे तरी काय ? ईश्वरेच्छा बलीयसी ! )



आँख, दिल और जिगर फिर भी तेरी चाह करें ।
तू नज़र आये गो जिस सिम्त हम निगाह करें ॥

हरमो-दैर कहाँ, दिल ही मुक़ामे-रब है ।
क्यूँ न दिलतक ही पहुँचने की कोई राह करें ॥

इश्क़ ' गर एक गुनह है प ' यही खुल्दे-बरीं
आवो, आदम का वही आज हम गुनाह करें ॥

कारवाँ मंज़िले-मक़सूद पे पहुँचे, के नहीं ।
काम चलना है, न मंज़िल की कोई चाह करें ॥

' अश्क ', ये ज़ीस्त मेरी, और ये तमाशा-ए-जहाँ ।
देखते चलिये के जो कुछ भी ये अल्लाह करें ॥

मित्रहो, नयनांतून जरी अश्रू वाहत नाहीत, तरीही मनाची, जीवनाची दुःखं लपविता येत नाहीत. ( केवळ ' अश्रू ' हेच दुःखसूचक नाही. )

दोस्तहो, त्या नाजूक सुन्दरीनं माझ्या दर्शनासाठी आपल्या पापण्या उचलाव्यात तरी कशा ? कारण ती सुंदरी इतकी नाजूक आहे, की पापण्यांचं ओझंही तिच्याकडून उचललं जाणार नाही.

ज्याप्रमाणे शिंपल्यात मोती निहित असतात, त्याप्रमाणे, हे मित्रांनो, प्रीतीच्या नाजूक मधुर भावना जपून ठेवा, लपवून ठेवा. कारण या प्रीति-भावनांच्या मोत्यांचं प्रदर्शन असं खुल्या बाजारात करणं बुद्धिमत्तेचं, सुसंस्कृत-पणाचं लक्षण नव्हे !

दोस्तहो, मला जगात सर्वांत प्रिय कोणती गोष्ट असेल, तर ते म्हणजे माझं हृदय ! आणि ते का प्रिय नसावं ? कारण या हृदयाव्यतिरिक्त माझी प्रिया मला जगात अन्यत्र कुठंही भेटत नाही. मग माझं हृदयच मला प्रिय का नसावं ?...

हे ' अश्क', जीवनातील दुःखांविषयी तक्रार तरी का करावी ?... ते व्यर्थच आहे ! कारण नशिबात जे लिहिलं गेलं असेल, ते घडणारच... ते काही केल्या पुसता येत नाही.



गो अश्क इन आँखों से बहाये नहीं जाते ।
फिर भी ये ग़मे-दिल हैं, छुपाये नहीं जाते ।

पलकें नहीं उठतीं वो मेरी दीद की ख़ातिर ।
नाज़ुक है के ये बोझ उठाये नहीं जाते ॥

रहने दो मेरे इश्क को–जूँ सीप में मोती ।
जज़्बे ये सरे-आम दिखाये नहीं जाते ॥

आलम में मुझे दिल के सिवा कौन हो प्यारा ।
वो दिल के अलावा कहीं पाये नहीं जाते ॥

अब, 'अश्क', ग़मे-ज़ीस्त की क्या कीजे शिकायत ।
तक़दीर के लिखे तो मिटाये नहीं जाते ॥

दोस्तहो, एकही स्वप्न नाही, कसलाही आनंद नाही, कुणीही मित्र नाही !— आज काहीच शिल्लक राहिलेलं नाही. मित्रहो, आजकाल मी असा जगतो आहे, जणू एखाद्या गुन्हेगारानं निरसपणं मिळालेली सजा भोगावी. (कधी कधी जीवन देखील एखाद्या बंदिवासासारखंच वाटू लागतं.)

मित्रहो, जीवनात आम्ही इमानदारीची फुलं मुक्तपणं उधळली... आणि त्या बदल्यात आम्हांला काय मिळालं, तर बेइमानीचे काटेच काटे ! खरंच, आमचं उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून आता जगात कुणीही कुणाशी इमानदारीनं वागू नये, हेच बरं !...

हे प्रिये, तू स्वप्नातही येऊ नयेस, हा मात्र उपेक्षेचा उच्चांक झाला. प्रेयसीनं प्रियकरावर रुसावं; जरूर रुसावं, पण अशा पद्धतीनं ? अरेऽऽरे ! काय हा दैवदुर्विलास ! केवढा हा उपेक्षेचा उच्चांक !

हे सुंदरी ! तू कुणालाही प्राप्त होत नाहीस, अशी तू आहेस तरी कोण ? कारण आपल्यामुळं कुणी मातीत मिळो, की कुणी लाख नवस करो, याची तुला तिळमात्रही चिंता नसते... खरंच, तू अशी आहेस तरी कोण ?

हे सुंदरी ! 'अश्क'चे प्राण कंठाशी आले आहेत. आता तरी तू ये ! अशा अवस्थेत हा 'अश्क' अगदी मनोमन इच्छा बाळगून आहे, की तुझ्यासमान प्रिय व्यक्तीनं त्याला आपल्या मायेच्या पदराखाली घ्यावं !

संग्रहालय ठाणे
२५०३
२४१५५
ना. क.
काव्य ८।३।८४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



न कोई ख़्वाब, न है लुत्फ़, न आशना कोई ।
यूँ जी रहा हूँ, के कटती है जूँ सज़ा कोई ॥

वफ़ा के फूल लुटाये, मिले हैं ख़ारे-जफ़ा ।
जहाँ में कौन करे किससे अब वफ़ा कोई ॥

हमारे ख़्वाब भी महरूमे-दीद हैं, यारों ।
अब इस कदर भी किसीसे न हो ख़फ़ा कोई ॥

ये क्या ग़ज़ब, के मुयस्सर नहीं किसी को तुम ।
कोई हो ख़ाक बसर या करे दुआ कोई ॥

हुआ है जाँबलब 'अश्क', अब तो आ जाओ ।
वो मुज़तरिब है के आँचल से दे हवा कोई ॥

हे प्रिये! माझ्या नजरेत स्वर्ग म्हणजे दुसरं-तिसरं काही नसून फक्त तुला प्राप्त करण्याचंच नाव आहे! म्हणूनच तुझा विरह म्हणजेच नरक-यातना होय!

हे प्रिये, जेव्हापासून माझ्यावर तुझ्या मादकसुन्दर दृष्टीची जादू झाली आहे, तेव्हापासून मन चुकूनही मदिरा आणि प्याल्याचं नाव घेत नाही. कारण तुझी मादक नजर मदिरेपेक्षा किती तरी ‘ नशीली ’ वाटते!

मित्रहो, आपलं मनच जर अंधारानं भरलेलं असेल, पापानं, द्वेषानं ग्रासलेलं असेल, तर मग मंदिर-मसजिदींमध्ये जाऊन आपल्याला काय मिळणार? काहीच नाही!

खरं तर हृदयात मानवतेच्या, प्रीतीच्या तेजाचा दीप उजळण्याचं नावच ‘ धर्म ’ होय!

हा ‘ सत्यधर्म ’ ज्याच्या हृदयात जागृत आहे, त्याला मंदिर-मसजिदींमध्ये जाण्याची काहीच गरज नाही.

दोस्तहो, रात्रंदिवस ती सुंदरी दर्पणापुढं शृंगार करण्यात मग्न आहे. मग अशा परिस्थितीत तिच्या नाजूक सुन्दर ओठांवर माझ्यासारख्या वेड्याचं नाव का यावं?......

माझ्यासारख्या ‘ कफल्लका ’ची त्या गर्विष्ठ सुन्दरीस आठवण का व्हावी!

जेव्हा जेव्हा मला विचारण्यात आलं, ‘ हे ‘ अश्क ’, प्रेम म्हणजे काय? ’ तेव्हा तेव्हा उत्तरादाखल मी फक्त एका ‘ पतंगा ’चंच नाव घेतलं आहे.

प्रेम पतंगाचंच दुसरं रूप होय!



खुल्द है मेरी नज़र में बस तुझे पाने का नाम ।
है जहन्नुम ज़िंदगी, तुझसे बिछड जाने का नाम ।

जबसे तारी है नज़र पर तेरी आँखों का नशा ।
भूलकर लेता नहीं दिल जामो-पैमाने का नाम ॥

क्या मिले दैरो-हरम में दिल ही जब्र तारीक़ है ।
अस्ल ईमाँ है दिल में नूर दर आने का नाम ॥

रोज़ो-शब मसरूफ़ है वो आईने के सामने ।
क्यूँ कर आये उनके लबपर मुझसे दीवाने का नाम ॥

जब भी पूछा है किसीने, 'अश्क', क्या है इश्क ये ।
मैंने हँस कर कह दिया है : 'एक परवाने का नाम' ॥

हे प्रिये, तुझ्या विरहात हे संपूर्ण जग म्हणजे एक कारुण्यपूर्ण कबरच भासते. आणि याच जगरूपी कबरीखाली एकाकी, बेवारशी प्रेत बनून मृत्यूच्या बाहुपाशात आयुष्यभर जगत राहिलो.

हे प्रिये, तुला शोधण्यासाठी, तुझ्या इच्छेनं व्याकूळ होऊन माझी दृष्टी तुझ्याशिवाय सतत एखाद्या हरिणीप्रमाणे बेचैन, चंचल अशीच राहिली तुझ्या दर्शनाभिलाषेनं सतत भिरभिरत राहिली.

हे प्रिये! तुझ्या प्रीतीला मी भक्तीचा, तपश्चर्येचा दर्जा दिला आहे. म्हणूनच, हे सुन्दरी, आता माझं मस्तक तुझ्याशिवाय इतर कोठेही झुकत नाही.

हे प्रिये, माझ्या पाणावलेल्या डोळ्यांना, तुझ्या रेशमी पदराचा आश्रय मिळाला असता, तर किती बरं झालं असतं! पण असं होऊ शकलं नाही. माझे दुःख–व्याकूळ डोळे आयुष्यभर पाणावलेलेच राहिले.

हे प्रिये, पाहा, माझी स्थिती आयुष्यभर किती करुणाजनक राहिली! पायांना जखमा, चोहीकडे अंधारच अंधार!

आणि एक भयाण एकाकीपण! ...

अशा स्थितीत जीवनाचा प्रवास तुझ्याविना कसा पूर्ण व्हावा? काही समजत नाही.




एक मज़ारे-बेक़सी है ये दहर तेरे बग़ैर ।
मौत के पहलू में सोये उम्रभर तेरे बग़ैर ॥

एक आहू की तरह हरदम परेशाँ ही रही ।
तेरे चेहरे की तमन्ना में नज़र तेरे बग़ैर ॥

तेरी चाहत को दिया है बन्दग़ी का मरतबा ।
अब नहीं झुकता कहीं मेरा ये सर तेरे बग़ैर ॥

तेरे आँचल का किनारा, काश, मिल जाता इन्हें ।
खुश्क होते ही न पायें चश्मे-तर तेरे बग़ैर ॥

'अश्क' तनहा, पाँव में छाले, अंधेरा हर तरफ़ ।
कैसे तय हो ज़िन्दगी का ये सफ़र तेरे बग़ैर ॥

दोस्तहो, माझ्या कल्पनेच्या राज्यात ती फुलासमान शरीराची नाजूक सुंदरी जेव्हापासून निवास करीत आहे, तेव्हापासून मनात मात्र काट्याप्रमाणे काही तरी सतत सलते आहे... कोण जाणे, असं का व्हावं? कारण फुलासमान नाजूक शरीरापासून काट्याच्या वेदना निर्माण व्हाव्या, हे आश्चर्यच नाही तर काय !...

हे प्रिये, तुझ्या विरहात हे जीवन असं काही व्यतीत होतंय् , की जणू एखादा विषाचा प्यालाच ओठांशी लावलेला असावा. खरोखर तुझ्यावीण जगणं विषवतच आहे.

जग-जीवनाचं क्रूर दुष्टचक्र, ईश्वराची अपदृष्टी !...

हे प्रिये, आमची केवळ तुझ्याच विरुद्ध नव्हे, तर सर्वांविरुद्धच तक्रार आहे. सर्वच जण आमच्याशी उपेक्षेनं वागले आहेत.

हे प्रिये, तुझ्या मीलनामुळंच माझं जीवन 'जीवन' ठरू शकतं. म्हणूनच तुझ्यासमवेत आयुष्य व्यतीत व्हावं, हेच मागणं मी ईश्वराला मागतो.

हे 'अश्क', अजूनही ध्येय ( मंजिल ) माझ्या दृष्टिक्षेपात आलं नाही. खरं पाहता, माझा तांडा ( काफिला ) कितीतरी दिवसांपासून प्रवास करीत आहे, वाटचाल करीतच आहे.




तसव्वुर में वो गुलबदन जब से है ।
ख़लिश दिल में एक ख़ार-सी तब से है ॥

गुजरती है यूँ बिन तेरे ज़िन्दगी ।
लगा जैसे एक जामे-सम लब से है ॥

ज़माने की गर्दिश, खुदा की नज़र ।
तुझीसे नहीं है, गिला सब से है ॥

तेरी ही तलब से है मेरी ज़िन्दगी ।
तेरे साथ गुजरे, दुआ रब से है ॥

कोई, ' अश्क ', मंज़िल नज़र में नहीं ।
सफ़र में मेरा कारवाँ कब से है ॥

दोस्तहो, आज माझी अवस्था काय आहे, जरा पाहा तरी! मनाची बाग, इच्छेच्या सुगंधानं दरवळतही नाही. आजकाल मी अशा प्रकारे जगतो आहे, की जणू जगतच नाही! खरंच जगूनही जगल्यासारखं वाटत नाही.

हे धर्ममार्तंडांनो, माझी भक्ती कशी आहे, जरा ऐका तरी...मी नमस्कार तर करतो, पण माझं मस्तक झुकलेलं मात्र दिसत नाही. मस्तक न झुकवताही मी नमस्कार करू शकतो. हीच माझ्या भक्तीची श्रेष्ठता आहे. (कर्मकांडापेक्षा निर्गुण भक्तीचा दर्जा कधीही श्रेष्ठच असतो.)

हे दुर्बलते, मला तू कोणत्या ठिकाणी आणून सोडलंस, ही माझी काय अवस्था तू केलीस!...समोर 'मंज़िल' दिसतेय्, आणि माझ्याकडून पाऊल उचललं जात नाही.

हे प्रिये, कधी काळी तुझ्या प्रेमात मग्न होऊन मी जगाला पूर्णपणे विसरून गेलो होतो; पण आजकाल त्याच जगात मी इतका कार्यमग्न झालो आहे, की आता तू आठवतही नाहीस. हा काळाचाच महिमा, नाही तर काय?

हे 'अश्क', या जगात काही निवेदन करणं चुकीचं आहे, व्यर्थ आहे. कारण इथं इतका कोलाहल वाढला आहे, की कुणी-कुणाचं काही ऐकून घ्यायला तयारच नाही. मग बोलण्यात अर्थ तरी काय?



बाग़े-दिल बू-ए-तमन्ना से महकता भी नहीं ।
यूँ तो ज़िन्दा हूँ, प,' ज़िन्दा हूँ, ये लगता भी नहीं ॥

अहले-ईमाँन, सुनो, मेरी इबादत क्या है ।
सजदा करता हूँ मगर सर मेरा झुकता भी नहीं ॥

वक्त ने आज कहाँ ला के घेरा है मुझे ।
सामने है मेरी मंज़िल, क़दम उठता भी नहीं ॥

तेरी चाहत में भुलाया था ज़माने को कभी ।
अब हूँ मसरूफे-ज़माँ, याद तू रहता भी नहीं ॥

'अश्क', बेकार है दुनिया में तुम्हारा कहना ।
शोर इतना है यहाँपर, कोई सुनता भी नहीं ॥

दोस्तहो, त्या सुंदरीच्या ( मदिराक्षीच्या ) नयनांची दोन-दोन मादक मदिरालयं मिळाल्यावर, सुरई आणि प्याले अप्राप्य राहिले, तरी आम्हांला वाईट का वाटावं !

नयनांची दोन-दोन मदिरालयं कधीही अधिक फायद्याची.

हुंदके, दुःख, बदनामी, अश्रू, भ्रम...दोस्तहो ! पाहा, प्रेमात आम्हांला कोणकोणत्या भेटी मिळाल्या.

हे प्रिये, तू प्रत्यक्षात भेटत नाहीस, म्हणून तुझ्या स्वप्नात तरी रंगून जावं, असं मला वाटतं. पण काय करावं, हेही शक्य होत नाही. कारण, तुझ्याप्रमाणे तुझी स्वप्नं देखील परकीच निघाली. ती सुद्धा आमची होऊ शकली नाहीत.

हे प्रिये, आयुष्याचा प्रत्येक क्षण तुझ्या इच्छेनंच भारावलेला होता. म्हणूनच माझ्या प्रत्येक शोधात तुझ्याच कथा-कहाण्या, किस्से सापडले, यात आश्चर्य ते काय ! माझ्या प्रत्येक शोधात तुझाच शोध लपलेला होता.

हे ' अश्क ', आम्ही दुःख शोधण्याच्या विचारानंच निघालो असतो, तर बरं झालं असतं ! कारण सुख शोधायला आम्ही निघालो आणि पदरात पडलं दुःखच दुःख !....

म्हणूनच या उलट वागलो असतो, तर बरं झालं असतं !



फ़िक्र क्या इसकी, के हमको खुम, न पैमाने मिले ।
चश्मे-साक़ी के हमें जब दो-दो मयख़ाने मिले ॥

आहो-ग़म, रुसवाईयाँ, आँसू, फरेबे-ज़िन्दगी ।
इश्क में तेरे हमें क्या क्या न नज़राने मिले ॥

तू नहीं मिलता, तो तेरे ख़्वाब में खो जाऊँ मैं ।
ख़्वाब भी तेरी तरह, ऐ दोस्त, बेगाने मिले ॥

उम्र का हर पल तेरी ही ख्वाहिश में सरगर्दा रहा ।
मेरी सारी जुस्तजू में तेरे अफसाने मिले ॥

'अश्क', बेहतर था अगर वीराने ही हम ढूँढते।
ढूँढने निकले बहारें और वीराने मिले ॥

हे सुंदरी, तुझ्या सौंदर्यात इमानदारीचा रंग कोठे दिसतच नाही; मग तुला ' पूर्ण कलाकृती ' कसं म्हणायचं आणि का म्हणायचं ? कारण एक पाकळी कमी असली, तरी फुलाला पूर्णता येत नाही.

तेच तुझ्या बाबतीत झालं आहे. तुझ्या रंगीत सौंदर्यात प्रामाणिकपणाचा रंग कोठेच आढळत नाही.

दोस्तहो, माझी जीवननौका प्रत्येक क्षणी संकटाच्या वादळ–वाऱ्याशी झगडत आहे. आता मी कोणत्या दिशेला जाऊ ? आधाराचा किनारा तर कोठे दिसतच नाही. नजरेला दिसतंय्, ते फक्त तुफान !

हे प्रिये, माझ्या बाबतीत फक्त तूच अत्याचारी आहेस, असं नाही. या दुनियेत रक्ताला आसुसलेले खरीददार फार आहेत. तसं पाहता, आमच्या मानेवर खंजीर फिरवणारे तुझ्याशिवाय आणखीही बरेच आहेत. फक्त तूच मारेकरी आहेस, असं नाही.

दोस्तहो, आता कुणाशी प्रेम जुळणं केवळ स्वप्नवत ठरेल ! पण याबद्दल तक्रार ती काय करावी ? कारण, यात केवळ माझाच दोष आहे. आपल्या-जवळ आता हृदयच शिल्लक राहिलं नाही, मग हृदयदान तरी कसं करावं ? आणि प्रेम तरी कसं करावं ?

हे ' अश्क ', माझे हे अश्रू, अश्रू नसून ते हृदयरूपी सागरातील जणू मोतीच आहेत ! आणि तेच मी इतरांना बहाल करू इच्छितो; पण काय करावं, या अश्रूंचं खरं मोल करणारा आणि स्वीकारणारा कुणी या जगात दिसतच नाही.




हाय ! तेरे हुस्न में रंगे-वफ़ा शामिल नहीं ।
एक भी गर पंखडी कम हो, तो गुल कामिल नहीं ॥

लमहा लमहा है रवाँ, तूफ़ाँन में कश्ती मेरी ।
जाऊँ किस रुखपर के नज़रों में कोई साहिल नहीं ॥

और भी खंजर हैं, चलते हैं गले पर दिनरात ।
खून के गाहक बहोत हैं, सिर्फ तू, कातिल, नहीं ॥

अब किसीसे दिल लगाना ख्वाब की सी बात है ।
किससे क्या शिकवा करें, पहलू में अपने दिल नहीं ॥

'अश्क', ये आँसू नहीं, मोती हैं बहरे-क़ल्ब के ।
बख़्श देना चाहता हूँ, पर कोई भी साईल नहीं ॥

दोस्तहो, आम्हांला हसण्याची फार इच्छा होती, पण काय करावं! हसण्याच्या प्रयत्नांत एकदम रडूच कोसळलं! हृदयरूपी वस्त्र दुःखाश्रूंनी भिजवून बसलो. खरंच आम्ही जीवनात हसू शकलो नाही.

दोस्तहो, आजकाल आमच्या रात्री स्वप्नविरहित अशाच व्यतीत होतात. पूर्वी प्रियेच्या स्वप्नमीलनाचा तरी आनंद गाठीशी होता. हाय, रे, दुर्दैवा! आता तो आनंदही आम्ही गमावून बसलो आहोत.

दोस्तहो, ईश्वर एकच आहे; पण हे आपल्याला कधीच उमगलं नाही, पटलं नाही. मंदिर आणि मसजिद यांचे मतभेद उराशी बाळगून आम्ही सर्वजण उगीचच दूर-दूर बसलो आहोत. धर्मभेदामुळंच अखिल मानव-जात दुभंगली आहे. हे किती योग्य आहे!

दोस्तहो, प्रेम हा एक उन्माद आहे आणि हा उन्मादही साधा उन्माद नाही. या उन्मादामुळंच फक्त प्रेयसीची आठवणच शिल्लक राहिली. बाकी सर्व सर्व धुळीला मिळालं—इतकं, की आम्ही स्वतःचीही खबर हरवून बसलो. खरंच प्रेम म्हणजे मूर्तिमंत उन्मादच!

हे 'अश्क', प्रीतीच्या या सागरात लाखो वादळं आहेत. जीवनरूपी नौका आम्ही यात बुडवून बसलो. प्रीतीपासून होणाऱ्या हानीपासून जीवनाला आम्ही वाचवूच शकलो नाही.




मुस्कुराने की तमन्ना थी, मगर रो बैठे ।
दामने-दिल को तेरे दर्द में भिगो बैठे ॥

अब तो बेख़्वाब गुजरती हैं हमारी रातें ।
ख़्वाब था, लुत्फ़ कभी, अब्र तो वो भी खो बैठे ॥

एक है एक-फ़क़त, एक खुदा है, यारों ।
दूर ही दूर मगर दैरो-हरम हो बैठे ॥

इश्क है एक जुनूँ, और जुनूँ है ऐसा ।
याद, बस, यार रहा, अपनी ख़ब्रर खो बैठे ॥

एक दरया-ए-मुहब्बत है तलातुम लाखो ।
कश्ती-ए-ज़ीस्त को, ऐ 'अश्क', हम डुबो बैठे ॥

हे मृत्यो ! आता तुझं आगमन होवो, की न होवो, तुझी प्रतीक्षा मला राहिली नाही. कारण आता जीवनच मृत्यूसमान झालं आहे...मग व्यर्थ तुझी प्रतीक्षा तरी का ? कारण जीवनात मला मृत्यू दिसतो आहे.

हे कर्मठ धर्मोपदेशका,

'प्रेमाचा त्याग करा,' 'प्रेमाचा त्याग करा' अशा वृथा उपदेशानं तू कंठशोष का करून घेतोस ? जरा अंतर्मुख होऊन, विचार करून तूच सांग पाहू, की ज्या ईश्वरामुळं तू असं म्हणतोस, तो तुझा ईश्वरही प्रेमाचा गुन्हेगार नाही का ? मग तुझ्या उपदेशकार्याला काय अर्थ आहे, तूच सांग !

हे प्रिये, माझ्या हृदयात, बुद्धीत, इतकंच नव्हे, तर माझ्या प्रत्येक श्वासोच्छ्वासात फक्त तूच तू सामावलेली आहेस. तरीही हे काय आश्चर्य आहे, पाहा, की तू दृष्टीचा विषय होऊ शकत नाहीस. खरोखर हे नवल आहे !

हे धर्मोपदेशकांनो, पंडित-मौलवींनो ! जीवनाविषयी आम्हांला काहीतरी नवीन, प्रगतिवादी, पुरोगामी मार्गदर्शन करा, कारण आता मंदिरं आणि मसजिद या दोन्ही ठिकाणी खरं सुख उरलं नाही, हेच खरं !

हे 'अश्क', एखादं मधुर वाद्य छेडून तूच एखादी सुन्दर ग़ज़ल गा. पुष्कळ वेळ व्यतीत झाला, तरी अजूनही या कविसंमेलनात म्हणावा तसा रंग आला नाही...गा, लवकर गा !....कदाचित तुझ्या जिवन्त, मर्मग्राही, प्रभावी सुन्दर काव्यानंच या मैफलीत प्राण येईल.



हयात मेरे लिये मौत है, बहार नहीं ।
न आ, ऐ मौत, मुझे तेरा इन्तज़ार नहीं ॥

मुझे न रोक मेरे जुर्मे-इश्क़ से, जाहिद ।
खुदा भी इश्क़ का बतला गुनहगार नहीं ॥

दिलो-दिमाग में, हर साँस में है तू ही तू ।
मेरी नज़र पे मगर फिर भी आशकार नहीं ॥

मुझे, ऐ शेखो-बरहमन, बताओ राह नयी
न दैर में, न हरम में, कहीं क़रार नहीं ॥

उठाओ साज़, ग़ज़ल छेड दो तुम्ही, ऐ 'अश्क',
के बज़्मे-शेर अभी तक तो खुशगवार नहीं ॥

हे प्रिये, रात्रंदिवस मी तुला नमस्कार करीत असतो. ही भक्तीच नाही, तर काय आहे ? प्रत्येक क्षणी तुझी आठवण, तुझाच ध्यास, तुझाच विषय– हे ' प्रेम ' नाही, तर काय आहे, तूच सांग !

हे प्रिये, तुला पाहत राहणंही प्रलयासमान आहे आणि न पाहणंही प्रलयासमानच आहे. दोन्ही अवस्था त्रासदायकच ! मग तूच सांग, प्रिये, तू म्हणजे हर तऱ्हेनं जिवावरचं संकटच नव्हे काय !

हे सुन्दरी, तू पडद्याआड लपलेली आणि दर्शनवंचित असा मी ! खरोखरच ही तुझी अवस्था त्या ईश्वराप्रमाणंच नाही का ? ईश्वरही अस्तित्वात असूनही प्रत्यक्ष नजरेला मात्र कधीच दिसत नाही.

दोस्तहो, आयुष्य किती दीर्घ असतं, हे रहस्य आम्हांला विरहरात्रीच कळालं–मनोमन पटलं. कारण एक क्षणही व्यतीत होऊ नये, ही ' दीर्घता 'च नव्हे, तर काय आहे ?

' हे अश्क ', ती सुंदरी प्रतिस्पर्ध्याच्या बाहुपाशात आणि आम्ही मात्र स्वप्नापासूनही वंचित !....हे ज्याचं त्याचं ' नशीब ' नव्हे, तर काय आहे ?



सजदे तुझे करूँ, ये इबादत नहीं, तो क्या ?
दिन-रात याद तेरी, मुहब्बत नहीं, तो क्या ?

महशर है देखना, तो क़यामत न देखना
तुम ही कहो, ये कोई मुसीबत नहीं, तो क्या ?

पर्दों में आप और मैं महरूमे-दीद हूँ ।
ये बन्दे, खुदा जैसी ही हालत नहीं, तो क्या ?

कितनी दराज़ उम्र है जाना ये हिज्र में ।
लम्हा भी कट न पाये, तवालत नहीं, तो क्या ?

आग़ोश में अदू के वो, महरूमे-ख्वा़ब हम ।
'ऐ 'अश्क', अपनी-अपनी ये किस्मत नहीं, तो क्या ?

हे प्रिये, यातनांपासून, वेदनांपासून, दुःखापासून आम्ही आमच्या जीवनाला वाचवूच शकलो नाही. कारण काही केल्या आम्ही तुला विसरूच शकलो नाही. तुझ्या स्मृतींचं सातत्य म्हणजे हे सर्व अटळच आहे !

काय करावं ! आजकाल जणू ' स्मित ' रुसलंच आहे. ते ओठांवर येतच नाही. हे प्रिये, जेव्हापासून तू माझ्या जीवनातून निघून गेलीस, तेव्हापासून आतापर्यंत मी हसूच शकलो नाही...

हे सुन्दरी, तुझ्या अत्याचारांमुळं मनाची वस्ती अशी काही उद्ध्वस्त झाली, की बस ! हे ' गाव ' पुन्हा आम्ही वसवूच शकलो नाही. ते तसंच उजाड राहिलं.

हे प्रिये, तुझ्या विरहात दुःखी मनाची समजूत घालण्यासाठी आम्ही काय केलं नाही ? प्रत्यक्ष ' त्रिभुवन 'ही आम्ही खेळणं म्हणून त्यापुढं ठेवलं ! पण व्यर्थ ! तरीही व्याकूळ, दुःखी मनाला आम्ही हसवू शकलो नाही.

हे ' अश्क ', जरा त्या सुन्दरीचं लाजणं तर बघ ! लाजण्यामुळंच स्वप्नातही तिला आपला ' घूँघट ' काढता आला नाही. स्वप्नातही ती पडद्याआड लपून राहिली. लाजण्याची ही मात्र सीमाच झाली !



ग़मे-दिलसे दामन बचाना न आया।
किसी तरह तुमको भुलाना न आया॥

हँसी अपने होंठोंसे रूठी हुई है।
गये जबसे तुम, मुस्कुराना न आया॥

तुम्हारी जफाओं से दिल ऐसा उजडा।
शहर ये हमें फिर बसाना न आया॥

तेरे हिज्रमें दो जहाँ भी दिये पर।
किसी तौर दिल को हँसाना न आया॥

हया ऐसी, ख़्वाबों में भी, 'अश्क', उनको।
किसी तरह बेपरदा आना न आया॥

त्या सुन्दरीच्या चित्ताकर्षक हावभावांची, हालचालींची चर्चा, तिच्या बेइमानीची चर्चा, तिच्या सौन्दर्याची, तारुण्याची चर्चा! दोस्तहो, माझ्या व्याकूळ हृदयाच्या एका चर्चेतून अशा अनेक चर्चा निघतात. माझं व्याकूळ हृदय म्हणजे या सर्व गोष्टी आल्याच!

मंदिरात-मसजिदीत वास्तव्य करणाऱ्या हे पंडित–मौलवींनो! मला गप्पच बसू द्या, शान्त, मौन राहू द्या. कारण मी बोलू लागल्यास क्रान्तीचाच विषय बोलेन आणि त्यामुळं तुमची मंदिरं–मसजिदी थरथर कापू लागतील. म्हणून मला गप्पच बसू द्या. यात तुमचाच फायदा आहे.

हे प्रिये, तुझ्यासमवेत एखाद्या उपवनात जावं, असं मला कधीच वाटत नाही. कारण असं केल्यास त्या उपवनात तू असताना बिचाऱ्या गुलाबाच्या फुलांची स्तुती कोण करील!

हे धर्मोपदेशका, 'ईश्वर कणा-कणांत विराजमान आहे,' असं तुझंच तर म्हणणं आहे. मदिरा आणि चषकात मी मन रमविल्यास वाईट काय आहे? कारण तुझ्या तत्त्वज्ञानानुसार ईश्वर त्यातही असणारच!

हे 'अश्क', जीवनात आम्हांला सर्वांकडून जखमाच जखमा मिळाल्या. शत्रू असो, की मित्र असो! सर्वांनी जखमाच दिल्या.



अदा की बात, जफाओं की और शबाब की बात ।
हज़ार बातें निकाले दिले-ख़राब की बात ॥

न छेडो, वरना लरज़ जायेंगे ये दैरो-हरम ।
ऐ अहले-दील, करूँ मैं जो इन्क़लाब की बात ॥

न जाऊँ मैं किसी गुलज़ार में तुझे लेकर,
के तुझको देख करे कौन फिर गुलाब की बात ॥

तेरा ही क़ौल है, जाहिद, 'खुदा है हर शै में'।
बुरा है क्या, जो करूँ प्याला-ओ-शराब की बात ॥

हमें तो, 'अश्क', सभी से मिले हैं दागे जिगर ।
हो बात, चाहे रक़ीबों की, या जनाब की बात ॥

हे प्रिये, माझे डोळे माझ्याप्रमाणेच दुर्दैवी आहेत. कारण त्यांच्यापासून तू दूर आहेस आणि माझं हृदय माझ्या प्रतिस्पर्ध्याप्रमाणंच सुदैवी आहे. कारण ते कायम तुझ्याजवळच राहतं. माझे डोळे आणि माझं हृदय यांच्या नशिबांत तोच फरक आहे, जो फरक माझ्या व प्रतिस्पर्ध्याच्या नशिबांत आहे.

दोस्तहो, त्या सुस्वरूप फुलासमान सुन्दरीला पत्रच लिहावयाचं झाल्यास ते प्रेमपत्र पोहोचविण्याचं काम आम्ही स्वतःच करू. कारण ती प्रिया इतकी सुन्दर आहे, की पत्रवाहकाचं काम एखाद्या देवदूतानं जरी केलं, तरी तिचं अप्रतिम सौंदर्य पाहून त्याचं मनही प्रेमविव्हल होऊन पाघळू लागेल आणि मला हे घडूच द्यायचं नाही.

(पिंजऱ्यातील बंदिवान पक्षी म्हणतो.) मित्रहो, आजकाल दुःख, यातना–वेदना, व्याकुळता, बेचैनी हेच आमचं नशीब बनून गेलं आहे. आता 'ते' सुखाचे दिवस कोठे ? आज ती समृद्धीही नाही. ते घरटंही नाही. ते सुंदर रंग, तो सुगंधही नाही.

दोस्तहो, मान्य आहे, की मी माझा मार्ग सतत बदलतो आहे. पण ते 'मंजिल'च्या (ध्येयाच्या) आशेनंच ! माझ्या प्रत्येक दृष्टिक्षेपात, प्रयत्नात, शोधात ध्येयाचाच शोध लपलेला आहे.

हे 'अश्क', मदिराक्षीच्या अनुपस्थितीमुळं मदिरालयात चोहींकडे उदासीनताच पसरली आहे. एकमेकांशेजारी असलेले सुरई आणि प्याले असे भासत आहेत, जणू ते एकमेकांच्या गळ्यात पडूनच रडत आहेत, की काय !



आँखें सियाहबख्त हैं–मुझसी, के दूर तू ।
दिल तेरे पास है, तो वो खुश-जिस तरह अदू ॥

लिखूँगा खत, तो खुद ही मैं पहुँचाऊँगा उन्हें ।
क़ासिद फरिश्ता भी हो, बहक जाये रूबरू ॥

बेताबियाँ ही अपना मुकद्दर हैं इन दिनों ।
अब वो वहार है, न नशेमन, न रंगो-बू ॥

रस्ते बदल रहा हूँ मैं मंज़िल की चाहमें ।
मेरी हरएक निगाह में मंज़िल की जुस्तजू ॥

साक़ी बग़ैर, 'अश्क', उदासी है हर तरफ ।
रोते हैं जैसे मिलके गले, जाम और सुबू ॥

दोस्तहो, मी प्रेमिक आहे, म्हणूनच माझ्या नशिबात फुलांनी बहरलेली बाग कोठून असणार! तर माझ्या नशिबी खरखरीत वाळवंटच असणार! आणि वेडापिसा होऊन, त्या वाळवंटात आक्रोश करीत, रुदन करीत, दुःख-व्याकूळ होऊन मी दिशाहीन भटकत असेन आणि माझा ईश्वर मात्र बहिरा असेल. कारण माझी कोणतीच दाद-पुकार, मनोगत, आक्रोश त्याच्यापर्यंत पोहोचणारच नाही. परंपरेनुसार एका प्रेमिकाच्या नशिबी यापेक्षा वेगळं काय असणार?

ही मंदिरं, या मसजिदी म्हणजे फक्त भिंतींच्या सजावटी होत. या पलीकडे त्यात काही अर्थ नाही. मग त्यांत ईश्वर तर नाहीच नाही! आणि असं असूनही, त्या भिंतींवरही पंडित-मौलवींचा पहारा असेल! त्याही मुक्त नसणार.

हे प्रिये, तुला विसरण्यासाठी मी एखाद्या बागेत गेलो, तरी ते व्यर्थच ठरणार आहे! कारण, हे सुन्दरी, तेथील प्रत्येक फुला-फुलांतून तुझाच सुंदर चेहरा डोकावेल. अशा स्थितीत, तुला विसरण्यासाठी बागेत जाणं किती मूढपणाचं आहे, तूच सांग.

दोस्तहो, 'प्रेम' हा असा रंग नाही, की जो पुसून टाकल्यानं नष्ट होईल. खरं पाहता, प्रेमाची रीतच उलटी असते. या रंगाला तुम्ही जितकं पुसून टाकण्याचा प्रयत्न कराल, तितका हा अधिकच खुलून दिसेल-जास्तच गडद होईल. चैतन्यशील बनेल. तर, मित्रहो, खरोखरच प्रेम हा एक अजब रंग आहे- गूढ रहस्य आहे.

दोस्तहो, शंका कशाला? ज्याअर्थी मैफलीतून 'वाह!.... वा!!' चे सूर उठत आहेत, त्याअर्थी नक्कीच, कवी 'अश्क'च त्या ठिकाणी आपल्या गजलेतील काही शेर ऐकविण्यासाठी उभा राहिला आहे!



आशिक हूँ, किस्मत में सहरा होगा ।
रोऊँगा मैं और खुदा बहरा होगा ॥

दीवारें हैं दैरो-हरम फ़क़त ऐसी ।
शेखो-बिरहमन का जहाँ पहरा होगा ॥

मौसमे–गुल में भुलायें तुझको कैसे ।
फूल-फूल में तेरा ही चेहरा होगा ॥

मिटाने से मिटे, रंग वो नहीं इश्क ये ।
मिटाओगे तो, और ही गहरा होगा ॥

महफिल की 'वाह ! वाह !!' से है ज़ाहिर ।
ग़ज़ल सुनाने 'अश्क' ही ठहरा होगा ॥

दोस्तहो, ती सुन्दरी स्वप्नात जरी आली असती, तरी तक्रारीचं काहीच कारण नव्हतं. पण त्या गर्विष्ठ सुन्दरीचा स्वप्नात येण्याचा स्वभाव तरी कोठे आहे! आणि म्हणूनच आमची तक्रार आहे.

दोस्तहो,

माझ्या जखमांना, दुःखांना पाहून माझी विचारपूस करावी, माझं सांत्वन करावं, इतकी सवड या कार्यमग्न जगाला होती तरी कुठं! जो तो आपल्याच धुंदीत बुडालेला होता.

हे प्रिये, कधी कधी वाटतं, तुझी कृपादृष्टी झाली असती, तर किती बरं झालं असतं! पण हा वास्तव विचार सोडूनही चालत नाही, की मी कुठं अन् तुझी कृपादृष्टी कुठं!

दोस्तहो, माझं नाव एखाद्या सुंदरीनं आपल्या नाजूक, सुन्दर ओठांवर घोळवलंही असतं! पण हाय, रे, दुर्दैवा! जगात कुणाला माझी गरज होतीच कोठे?

हे 'अश्क', या काव्यकलेचा नाद, हे वेड मी सोडूनही दिलं असतं, पण काय करावं, माझ्या जीवनात दुसरं सुख आहे तरी कोठे?

साहित्य हेच माझं सर्वस्व आहे.



वो जो ख़्वाबोंमें भी आते, तो शिकायत थी कहाँ।
हाय, उस बुत की मगर ऐसी भी फितरत थी कहाँ॥

दिल के ज़ख्मों को मेरे देख, मेरे ग़म सुनता।
इतनी मसरूफ ज़माने को फुरसत थी कहाँ॥

मुझ पे, ऐ, काश, तेरी नज़रे-करम हो जाती।
मेरा मसकन था कहाँ, तेरी इनायत थी कहाँ॥

नाम लेता कोई अपना भी महकते लबसे।
हाय, अपनी किसी पैकर को ज़रूरत थी कहाँ॥

दामने-शेरो-सुख़न छोड भी देता मैं, 'अश्क'।
पर, बजुज़ इसके मेरी ज़ीस्त में राहत थी कहाँ॥

मित्रांनो, आमची स्थिती आम्ही काय वर्णावी ! दृष्टी आजकाल सतत शून्यातच रममाण होऊन राहते. आणि आम्हांला आजकाल स्वतःचीही खबर राहत नाही.

दोस्तहो, आजकाल हृदय सतत व्याकूळ राहतं आणि डोळे नेहमीच पाणावलेले असतात. काय करावं, ती दुरावलेली प्रिया आजकाल सारखी आठवते.

दोस्तहो, घरात काय राहावं ? कारण ते तर आमच्यासाठी एक उजाड वन बनून गेलं आहे. म्हणूनच आम्ही उजाड वनातच भटकत राहतो— तेच आमच्यासाठी घर बनलं आहे. तर आजकाल आमची स्थिती अशी आहे.

दोस्तहो, वेदना, यातना, दुःख आपली मर्यादा ओलांडतात, आणि मग आपोआपच ओठांवर स्मित उमटतं. आजकाल स्मित जीवनात प्रवेश करतं-पण कशा प्रकारे ? पाहा !

दोस्तहो, जीवनानं आम्हांला जिवन्तपणीच मारून टाकलं आहे. चला, एका दृष्टीनं हे बरंच झालं ! कारण यामुळंच आजकाल मृत्यूची भीती तरी आम्हांला राहिली नाही.

हे ‘ अश्क ’, दुःखही नाही आणि सुखही नाही. आता फक्त एक नीरव शांतताच शांतता जाणवत आहे. न कळे, आजकाल जीवनाचा तांडा कोणत्या मार्गावरून चालला आहे ?

ग्रंथालय ठाणे
२५०३
२४१५५
काव्य ८।३।८४
शाखा (स्थळ प्रत)



ख़लाओं में है बस नज़र इन दिनों ।
नहीं खुद की हमको ख़बर इन दिनों ॥

परेशाँ है दिल, आँख तर इन दिनों ।
याद आये वो बेश्तर इन दिनों ॥

घर बन गया है एक वीराना-सा ।
और वीराना है घर इन दिनों ॥

हमें ज़िन्दगी ने ही मार डाला है ।
नहीं मौत का हमको डर इन दिनों ॥

खुशी है न ग़म, 'अश्क', क्या बात है ।
ये किस राह से है गुज़र इन दिनों ॥

REFBK-0024155
REFBK-0024155

'किरण प्रकाशना'तर्फे प्रकाशित होणारे
प्रा. टी. के. जाधव यांचे
आगामी साहित्य

इंद्रधनु : मराठी गझल-संग्रह

हुंदका : कथा-संग्रह

साहेब : स्वतंत्र तीन अंकी नाटक

ठसे : व्यक्तिचित्र-संग्रह

शायर : लघु कादंबरी

**Smiles and Tears**
( 'भावतरंग' या काव्यसंग्रहाचे इंग्रजी भाषान्तर )